महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

मूल्य २/- रुपये

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः २५, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार १७ सप्टेंबर २०२४ ते सोमवार २३ सप्टेंबर २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## महाराष्ट्रात दिवाळीनंतरच विधानसभा, ३ टप्प्यात मतदान?; मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडूनच दुजोरा

■ मुंबई : (विशाल कारंडे)- राज्यातील विधानसभेच्या निवडणुकांसाठीची घोषणा पुढील महिन्यात पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. तर, दिवाळीनंतरच निवडणुकांचे फटाके फुटणार आहेत. सर्वच राजकीय पक्षांकडून जोरदार तयारी सुरू असून विधानसभा मतदारसंघात उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. तसेच, आपल्याला महाविकास आघाडी किंवा महायुतीमध्ये संधी पाहून, किंवा संधी मिळणार नाही, याचा अंदाज घेऊन उमेदवारांचेही पक्षांतर सुरू आहे. दरम्यान, यापूर्वीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभा निवडणुकांबाबत भाष्य केलं होतं. आता, पुन्हा एकदा त्यांनी अनौपचारिक गप्पांमध्ये विधानसभा निवडणुकांबाबत भाष्य केलं आहे.



त्यामुळे, विधानसभेच्या निवडणुका दिवाळीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात होतील. सन १९९९ नंतर महाराष्ट्रात पहिल्यांदाच विधानसभा निवडणुका एकापेक्षा अधिक टप्प्यात होण्याची यंदा दाट शक्यता आहे. २९ ऑगस्ट रोजी एबीपी माझाने दिलेल्या बातमीवर आता खुद्द मुख्यमंत्र्यांनीच शिक्कामोर्तब केले आहे. सन २०२४ उजाडला तेव्हापासून राज्यात विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका केव्हा होतील ही चर्चा सुरू आहे. सुरुवातीला विधानसभा निवडणुका लोकसभेत सोबतच होतील अशी चर्चा रंगली होती. त्यानंतर विधानसभा निवडणुका सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यात होईल अशी चर्चा सुरू झाली. मात्र, विधानसभा निवडणुका दिवाळीनंतर म्हणजेच नोव्हेंबरच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या आठवड्यात होईल आणि तीही एका टप्प्यात नसून दोन टप्प्यात होईल, अशी बातमी सर्वात आधी एबीपी माझा ने दिली होती. २९ ऑगस्ट रोजी सकाळी एबीपी माझा खात्रीलायक प्रशासकीय सूत्रांच्या आधारे बातमी दिली होती की, राज्यातील विधानसभा निवडणुका १२ ते १८ नोव्हेंबर दरम्यान होईल, आणि १९९९ नंतर पहिल्यांदाच राज्यात दोन टप्प्यात मतदान होईल.

(शेष पृष्ठ २ वर)

## संक्षिप्त

### उत्पन्न वाढवा, प्रोत्साहन भत्ता देऊ! आर्थिक कोंडीशी झुंजणाऱ्या एसटीकडून कर्मचाऱ्यांना आवाहन

■ नागपूर : सम्यक कासारे

आधी करोना व नंतर कर्मचाऱ्यांनी केलेल्या संपामुळे राज्य मार्ग परिवहन महामंडळ आर्थिक कोंडीत सापडले आहे. कर्मचाऱ्यांना मूळ वेतनात वाढीचे आश्वासन देण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर महामंडळाने उत्पन्न वाढीसाठी क्लृप्ती शोधली आहे. त्यानुसार उत्पन्न वाढवणाऱ्या चालक- वाहकांना रोखीने प्रोत्साहन भत्ता दिला जाणार आहे. २१ सप्टेंबर ते २० ऑक्टोबर हा या योजनेसाठीचा कालावधी ठरवण्यात आला आहे. उत्पन्नाचे उद्दिष्ट निश्चित




करताना आधी प्रत्येक फेरीतील महसुलाचा मूळ आकडा निश्चित करावा लागेल. यासाठी सप्टेंबर २०२३मधील सर्व दिवसांचे निव्वळ वाहतूक उत्पन्न (वाहकाने विक्री केलेल्या तिकिटांचे उत्पन्न) विचारात घेतले जाईल. प्रोत्साहन भत्त्यासाठी ठरलेल्या कालावधीत चालक/वाहकाविरुद्ध प्रवाशांशी गैरवर्तनाची तक्रार आल्यास व दोष सिद्ध झाल्यास, कर्तव्यावर असताना अनुचित पद्धतीने उत्पनामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न केल्याचे आढळल्यास, सवलतधारी अथवा इतर प्रवाशांना बसमध्ये प्रवेश नाकारल्याचे आढळल्यास प्रोत्साहन भत्ता मिळणार नाही.

### भारताचा जगभर डंका; मेट्रोच्या निर्मितीसाठी इस्रायलने मागितली मदत

■ इस्रायल : वृत्तसंस्था

इस्रायलचे भारतातील नवनियुक्त राजदूत रुवेन अझार यांनी उभय देशांचे संबंध, इस्रायल – हमास युद्ध, या युद्धातील भारताची भूमिका, पायाभूत सुविधांच्या क्षेत्रातील भारताची प्रगती, दोन्ही देशांमधील वेगवेगळ्या क्षेत्रांमधील भागीदारी अशा अनेक विषयांवर भाष्य केलं. बांधकाम, निर्मिती



व पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात भारताने केलेली प्रगती व देशभर चाललेल्या विकासकामांचा उल्लेख करत रुवेन अझार म्हणाले, आम्हालाही तेल अविवमध्ये १०० किलोमीटर लांबीची मेट्रो सेवा सुरू करायची आहे. त्यासाठी आम्ही जगभरातील कंपन्यांना, प्रामुख्याने भारतातील कंपन्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न आहोत. दी इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या मुलाखतीत रुवेन अझार म्हणाले, 'तेल अविवमध्ये मेट्रोच्या निर्मितीसाठी आम्ही आंतरराष्ट्रीय कंपन्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहोत. ज्या कंपन्या कमी खर्चात उत्तम दर्जाची मेट्रो सेवा निर्माण करू शकतात अशा कंपन्यांकडे आमचं लक्ष आहे.

## 'राहुल गांधींची जीभ छाटणाऱ्यांना ११ लाखाचं बक्षीस देऊ' शिंदेंच्या आमदाराचं वादग्रस्त वक्तव्य

■ मुंबई : राकेश गायकवाड

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांची जीभ छाटणाऱ्यांना ११ लाखांचे बक्षीस देऊ असं वादग्रस्त विधान शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार संजय गायकवाडांनी केलंय. आरक्षण संपवण्याची भाषा करणाऱ्या राहुल गांधींवर आक्षेपार्ह भाषेत संजय गायकवाडांनी टीका केलीय. आरक्षणाची भाषा संपवणाऱ्यांचं मनातील ओढावर आल्याचंही गायकवाड म्हणालेत. राहुल गांधी यांना मागासवर्गीय , आदिवासी सह इतरांचे शंभर टक्के आरक्षण संपवायचे आहे, काँग्रेसचा खरा चेहरा आणि पोटातील मळमळ बाहेर आली, असं आमदार संजय गायकवाड यांनी म्हटलं आहे. त्यांच्या वादग्रस्त विधानाचे तीव्र पडसात उमटण्याची शक्यता आहे. राहुल गांधींबद्दल वादग्रस्त विधान करणा-या संजय गायकवाडांविरोधात महाविकास आघाडीचे नेते आक्रमक झालेत. सत्तेमुळे हिंसेची व्यवस्था निर्माण झालीय. भाजपनं संजय गायकवाडांवर सुमोटो कारवाई अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष




नाना पटोले यांनी केलीय. तर मोदींबद्दल असं विधान केलं असतं तर जी कारवाई केली असती, तीच करावाई संजय गायकवाड करण्याची मागणी अंबादास दानवेंनी केलीय. दरम्यान संजय गायकवाड यांच्या वक्तव्यावर भाजपने हात झटकले आहेत. संजाय गायकवाड यांच्या वक्तव्याचं समर्थन करत नाही, असं भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे. तसंच आरक्षण रद्द करू असं राहुल गांधी म्हणाले.

## अजित पवारांनी महायुतीत किती जागा मागितल्या? छगन भुजबळांनी आकडाच सांगितला; म्हणाले...

■ मुंबई : गणेश बागडे

विधानसभेची निवडणूक दोन महिन्यांवर आल्यामुळे महाविकास आघाडी आणि महायुतीमधील पक्षांचे नेते कामाला लागले आहेत. निवडणुकीच्या अनुषंगाने अनेक राजकीय नेत्यांनी सभा, मेळावे आणि आढावा बैठका घेण्याचा धडाका लावला आहे. या माध्यमातून मतदारसंघाचा आढावा आणि विधानसभेसाठी उमेदवारांची चाचपणी करण्यात येत आहे. यातच मागील काही दिवसांपासून कोणता पक्ष किती जागा लढवणार? महायुतीचा जागावाटपाचा फॉर्म्युला कसा असणार? यावर वेगवेगळ्या चर्चा सुरु आहेत.

विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या जागावाटपात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला किती जागा मिळणार? तसेच शिवसेना शिंदे गटाला किती जागा मिळणार? याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. मात्र, आता अजित पवार यांनी महायुतीमध्ये किती



जागा मागितल्या आहेत? याचा खुलासा आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते, मंत्री छगन भुजबळ यांनी केला आहे. 'राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने महायुतीमध्ये ८० ते ९० जागा मागितल्या आहेत', असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. 'आमचे जे कारभारी आहेत, मग त्यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार प्रफुल पटेल, खासदार सुनील तटकरे हे विधानसभेच्या जागा वाटपासंदर्भात चर्चा करत असतात. त्यामुळे विधानसभेच्या जागावाटपासंदर्भातील चर्चा कुठपर्यंत आली हे त्यांना माहिती असतं. मी त्या चर्चामध्ये जास्त लक्ष घालत नाही. त्यांनीही मला जास्त काही सांगितलं नाही. पण मला वाटतं की राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने महायुतीमध्ये ८० ते ९० जागा मागितल्या आहेत. त्यावर किती निकाल येतो? याची मला कल्पना नाही', असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.

(शेष पृष्ठ २ वर)

## धनगर, धनगड एकच, लवकरच जीआर काढणार; मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठकीनंतर सरकारचा निर्णय

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

धनगड आणि धनगर एकच आहेत, असा जीआर काढण्याचा निर्णय राज्य सरकारकडून घेण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत



बैठकीनंतर शंभूराज देसाईनी ही माहिती दिली आहे. पंढरपूर येथे धनगर समाजाच्या वतीनं सुरू असलेल्या आमरण उपोषणावर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि धनगर समाजाचं शिष्टमंडळाची बैठक पार पडली. धनगर समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्याची प्रमुख मागणी आहे. धनगर आरक्षणासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला आहे. बैठकीनंतर उपोषण मागे घेण्याचं शिष्टमंडळानं आश्वासन दिलं आहे.

राज्य सरकारकडून मोठा निर्णय घेत, धनगर आणि धनगड एकच आहे, असा जीआर लवकरच काढला जाईल, असं आश्वासन देण्यात आलं आहे. हा जीआर कायद्याच्या कसोटीवर न्यायालयात टिकला पाहिजे, त्यासाठी जीआरचा मसुदा तयार करण्याचं काम केलं जाणार आहे. यासाठी दोन वरिष्ठ सनदी अधिकारी आणि सखल धनगर समाजाच्या पाच प्रतिनिधींची समिती स्थापन केली जाणार आहे. राज्य सरकारकडून नेमली जाणारी समिती पुढच्या चार दिवसांत जीआरचा मसुदा तयार करेल. त्यानंतर राज्याच्या महाधिवक्त्यांचं देखील यासंदर्भात मत घेतलं जाईल, असा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे.

(शेष पृष्ठ २ वर)

## '...म्हणून केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्यासाठी दोन दिवस मागितले', भाजपाचा मोठा आरोप

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

**दिल्ली सरकारच्या मद्य धोरण घोटाळयाप्रकरणी तिहार तुरुंगात असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे नुकतेच जामिनावर बाहेर आले आहेत. १३ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने त्यांचा जामीन मंजूर केला आणि त्याच दिवशी संध्याकाळी ते तुरुंगातून बाहेर आले. तुरुंगातून बाहेर पडल्यावर केजरीवाल हे वेगवेगळया सभा व कार्यक्रमांमधून केंद्रातील मोदी सरकारवर टीका करत आहेत.**

अशातच आज (१५ सप्टेंबर) त्यांनी आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांना संबोधित केलं. यावेळी त्यांनी मोठी घोषणा केली. 'पुढील दोन



दिवसांत मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार आहे', असं अरविंद केजरीवाल म्हणाले. केजरीवाल यांच्या या घोषणेनंतर यावर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. दरम्यान, भाजपानेही यावर भाष्य केलं आहे.

भाजपा नेते मनजिंदर सिंग सिरसा केजरीवालांच्या राजीनाम्याच्या घोषणेवर प्रतिक्रिया देताना म्हणाले, 'केजरीवाल यांनी राजीनामा देण्यासाठी दोन दिवसांची मुदत मागितली आहे. या दोन दिवसांत ते त्यांच्या पत्नीला मुख्यमंत्री बनवण्यासंदर्भात निर्णय घेणार आहे. यासाठी ते दोन दिवसांत पक्षातील सर्व आमदारांचं मन वळवणार'.

सिरसा म्हणाले, 'अरविंद केजरीवाल स्वतःहून राजीनामा देत नाहीयेत. सर्वोच्च न्यायालयाने त्यांना राजीनामा देण्यास भाग पाडलं आहे. न्यायालयाने त्यांना मुख्यमंत्रिपदावरून खडे बोल सुनावल्यानंतर त्यांच्याकडे दुसरा पर्यायच उरलेला नाही. केजरीवाल भ्रष्टाचारात इतके बुडालेत की सर्वोच्च न्यायालयाला म्हणावं लागलं की तुम्ही मुख्यमंत्रिपदावर बसून सह्या करू शकत नाही'.

भाजपा नेते म्हणाले, आता केजरीवाल म्हणतायत की जनतेचं जे म्हणणं असेल तेच होईल. त्यांनी तीन महिन्यांपूर्वी जनतेला विचारलं होतं जेल की बेल (तुरुंग की जामीन), त्यावर जनता म्हणाली जेल. याचाच अर्थ जनतेला जे हवं आहे ते त्यांनी सांगितलं आहे. मात्र केजरीवाल जनतेचं ऐकत नाहीत.

## मविआत मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत कोण-कोण? उद्धव ठाकरे स्पष्टच बोलले, 'मला त्या पदाचं स्वप्न...

■ नगर : सम्यक कासारे

'मी माजी मुख्यमंत्री आहे. माझे मुख्यमंत्री व्हायचे स्वप्न तेव्हाही नव्हते, आताही नाही. जनता हीच माझी सत्ता. या सत्तेतून मी निवृत्त होणार नाही. मला कोणीही निवृत्त करू शकत नाही,' असे प्रतिपादन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी रविवारी केले. महाविकास आघाडीमध्ये मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करण्याची ठाकरे यांची मागणी आणि त्यावर राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार), काँग्रेस पक्षाने घेतलेल्या वेगळ्या भूमिकेच्या पार्श्वभूमीवर ठाकरे या पदाच्या स्पर्धेतून बाहेर पडल्याची चर्चा सुरू झाली आहे. 'सरकारी कर्मचाऱ्यांनी साथ दिली नाही, तर सरकार चालू शकत नाही. तुम्ही



घरोघरी जाऊन सरकारच्या योजना पोहोचवण्याचे काम करता. मात्र, त्याचे श्रेय ते घेत आहेत. सरकारच्या योजना राबवणारे तुम्ही आहात, तरी योजनेच्या पोस्टरवर छायाचित्रे दाढीवाल्याची लागतात', असे सांगत उद्धव यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लक्ष्य केले. नगर जिल्ह्यातील कोपरगावमध्ये 'जुनी पेन्शन संघटने'च्या वतीने आयोजित अधिवेशनात ठाकरे बोलत होते. मराठवाड्याच्या दौऱ्यावर जाण्यासाठी ठाकरे शिर्डीत आले होते. प्रारंभी त्यांनी साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. 'करोनाकाळात तुम्ही सगळ्यांनी जिवावर उदार होऊन कामे केली, म्हणून महाराष्ट्र वाचला.

(शेष पृष्ठ २ वर)

## देशात काहीही बिनसलं की दोष हिंदूंवर... सरसंघचालकांच्या वक्तव्यानं वळवल्या नजरा

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

हिंदू धर्म हा सर्वांच्या हिताचीच कामना करणारा असल्याचं वक्तव्य सरसंघचालक मोहन भागवत यांनी केलं असून, त्यांच्या या वक्तव्यानं सर्वांचं लक्ष वेधलं. हिंदू धर्माचा अर्थच मुळात जगातील सर्वात उदार व्यक्ती असा असून, या व्यक्तीला सर्वच स्वीकारार्ह असतं अससं ते म्हणाले.


इतक्यावरच न थांबता भागवत यांनी स्वयंसेवकांना सामाजिक एकोप्याच्या मदतीनं बदल घडवून आणण्याचं आवाहन करत अस्पृश्यतेची भावनाच पूर्णपणे मिटवून टाकायची आहे असं म्हटलं.

अलवर येथील इंदिरा गांधी क्रीडा मैदानात स्वयंसेवकांच्या एकत्रीकरण कार्यक्रमाला संबोधित करताना भागवत यांनी ही वक्तव्य करत आपली भूमिका स्पष्ट केली. 'आपला देश समर्थ करायचा असून, आम्ही प्रार्थनेमध्येच म्हटलं आहे, की हे हिंदू राष्ट्र आहे. कारण, हिंदू समाजच त्याचा उत्तराधिकारी आहे. या राष्ट्राच्या हितातच हिंदू समाजाची किर्ती वाढते. राष्ट्रात काही बिनसल्यास त्याचा दोषही हिंदूंवरच येतो. कारण, तेच या देशाते कर्ते आहेत', असं भागवत म्हणाले.

हिंदू राष्ट्राला वैभवसंपन्न करण्यासोबतच देशाला



आणखी बलशाली करण्याचं काम पुरुषार्थाच्या भावनेनं करत संपूर्ण देशाला या सामर्थ्यायोग्य करण्याची आवश्यकता असल्याचं वक्तव्य त्यांनी केलं. 'आपण ज्यांना हिंदू म्हणतो तोच प्रत्यक्षात मानव धर्म असून, वैश्विक धर्म आहे. सर्वांच्या कल्याणाची कामना याच धर्मातून होते. मुळात हिंदूंचा अर्थच आहे जगातील सर्वात उदार मानव. ज्याच्या मनात प्रत्येकासाठी सद्भावना आहेत. हिंदू म्हणजे पराक्रमी पूर्वजांचे वंशज, जे त्यांच्या विद्येचा वापर वादांसाठी करत नसून, ज्ञानप्रसारासाठी करतात', या शब्दांत भागवत यांनी हिंदू पताका उचलून धरली. एक काळ असा होता जेव्हा संघाला कोणी ओळखत नव्हतं आणि त्या विचारधारणेला कोणी समजून घेत नव्हतं. पण, आता मात्र संघाला सर्वदूर ओळख मिळाली आहे असं म्हणत विरोधी गटही संघाचा उघडपणे विरोध करत असला तरीही अंतर्मनातून ही विचारधारणा समजून घेतो असं सूचक वक्तव्य भागवतांनी केलं. माध्यमांच्या गैरवापरामुळं नवी पिढी संस्कार विसरत चालली आहे असं म्हणताना भारतातही संस्कार धोक्यात असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली.




# शहाणपण देगा देवा!

...राजकारणाचा उतरत जाणारा स्तर पाहून हल्ली हे भजन फार आठवते. सत्ताधाऱ्यांना टोकाचा विरोध करावा, त्यांना कोंडीत पकडावे, हे विरोधी पक्षांचे विहीत कार्य आहे. पण ते पार पाडत असताना आपण एकंदरीत व्यवस्थेचीच लक्तरे काढत आहोत का, याचाही सारासार विचार त्यांनी करावा. समाजमाध्यमांतील अनिर्बंध अभिव्यक्तीचा असर राजकारणावरही झालेला दिसतोच आहे. त्यामुळेच थेट सरन्यायाधीशांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याइतकी मजल आता विरोधकांची गेली, याला काय म्हणावे?

हे विरोधक वास्तविक व्यवस्थेच्या विरोधात उभे नाहीत. त्यांचा विरोध आहे तो मोदी नावाच्या एका सत्ताधीशाला. या 'मोदीतत्त्वा'ची उणीदुणी काढण्याच्या नादात काहीवेळा कसे भान सुटते, याचा प्रत्यय नुकताच पुन्हा एकदा आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या दिल्लीतील निवासस्थानी प्रतिष्ठापित श्रीगणरायाच्या आरतीला हजेरी लावली, आणि त्याचे छायाचित्रही 'कौतुकाने' समाजमाध्यमांवर झळकावले. वरकरणी निरुपद्रवी वाटणाऱ्या या कृतीमुळे विरोधक पार बिथरले, आणि देशातली न्यायव्यवस्था मोडीत निघाल्याचा तारसप्तकी गळा त्यांनी काढला. सरन्यायाधीशांच्या घरच्या गणपतीला पंतप्रधान गेले, म्हणून नेमकी काय जगबुडी झाली, याचे उत्तम बुद्धिभेदक विवेचन करण्याची लगबगही डाव्या वैचारिकांमध्ये सुरू झाली.

हे सारे काय चालू आहे? असा भाबडा प्रश्न एखाद्या सुजाण नागरिकाच्या मनात आल्याशिवाय राहणार नाही. न्यायपालिका आणि संसद ही लोकशाहीची प्रमुख चाके असून त्यांनी एकमेकांकडे बघू नये, बोलूदेखील नये, भेटू तर अजिबात नये, अन्यथा अपघात ठरलेला, असा कुणाचा समज आहे काय?

न्यायदानाच्या प्रक्रियेला बाधा येईल, असे लागेबांधे दिसता कामा नयेत, याची दक्षता फार पूर्वीपासून घेतली जात असे. आजही बऱ्याच प्रमाणात हे पथ्य पाळले जाते. न्यायविषयक परिषदा अथवा शासकीय शिष्टाचाराबरहुकूम शपथविधीसारख्या



समारंभांना सरन्यायाधीश आणि पंतप्रधान एकमेकांना भेटतात, काही शिष्टसंमत सौहार्द व्यक्त होते.

परंतु, ते तेवढ्यावरच सीमित राहिले पाहिजे. याहून अधिक काही अनौपचारिक खेळीमेळी लोकशाहीला घातक, असे काहीतरी अपरिपक्व आकलन सध्या देशभरात तयार होऊ पाहाते आहे. ते तयार होण्यात राजकीय विरोधकांचा वाटा मोठा की समाजमाध्यमांचा उठवळ बाजार मोठा, हा विवादाचा विषय ठरावा.

सरन्यायाधीशांनी आपल्या घरी पंतप्रधानांना आरतीसाठी बोलावल्यामुळे लागलीच काही न्यायनिवाड्यांवरच परिणाम होऊन लोकशाही डबघाईला येईल, असे मानणे म्हणजे हेतुपुरस्सर सत्याचा अपलाप करणे आहे. पंतप्रधानांनी सरन्यायाधीशांच्या घरच्या गणरायाची आरती करणे म्हणजे गहजब झाला, असे वातावरण तयार करण्याचा प्रयत्न काहींनी केला.

महाराष्ट्रात उद्धव ठाकरे गटाचे नेते त्यात पुढे होते. अन्य विरोधी पक्षांनीही या प्रकाराला नाके मुरडली. पण एवढ्यावर हे थांबले नाही. नियतकालिकात सरकारविरोधी नियमित स्तंभ लिहिणाऱ्या वैचारिकांनीही तातडीने लोकशाहीच्या प्रकृतीची चिंता वाहिली. ''डॉ. मनमोहन सिंग हे तर घरी इफ्तार पार्टीचे आयोजन करीत, तेव्हा तत्कालीन सरन्यायाधीश जात असत,'' असे सचित्र समर्थन लगेच भाजपच्या नेत्यांनी केले.

या 'व्हॉटअबाऊटरी'ला तसा काही अर्थ नाही, हे खरे. पण न्यायपालिकेचे आणि संसदेचे राखणदार एकमेकांशी सौहार्दाच्या पातळीवर असू नयेत, असाही काही संकेत नाही. किंबहुना लोकशाहीत सर्वंकष सौहार्दच अपेक्षित असते. घरगुती गोष्टींमुळे बाधा यावी, असे तकलादू संबंध लोकशाहीला अंतिमत: मारकच ठरतात.

सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय जेव्हा सरकारविरोधात जातो, तेव्हा विरोधकांना 'न्याय अजून जागा आहे' याचा साक्षात्कार होतो. काही महिन्यांपूर्वी निवडणूक रोख्यांच्या संदर्भात याच सरन्यायाधीशांनी मोदी सरकारची खरडपट्टी काढत ते रोखेच रद्दबातल ठरवले होते, तेव्हा विरोधकांनी त्यांना दोन्ही हातांनी कुर्निसात केला होता.

आता एका गणरायाच्या एका आरतीने अचानक असे काय आभाळ कोसळले? पण असा प्रश्न करणेही फिजूल ठरावे, असा काळ आला आहे. राजहंस दाणागोटा खाताहेत, आणि मोतियाच्या चाऱ्याचे लाभार्थी कावळे ठरताहेत. हरेक गोष्टीचे राजकारण व्हावे, अशी व्यवस्था उभी राहात आहे. त्याची ही फळे!

धर्म, कर्मकांडे, श्रद्धा ही चार भिंतीपुरतीच मर्यादित ठेवावीत. पंतप्रधानांनी आपल्या समाजमाध्यमी मंचावर सरन्यायाधीशांकडील आरतीचे छायाचित्र का टाकले असावे, हे ओळखायला काही राज्यशास्त्राच्या अभ्यासाची गरज नसावी.

धार्मिक आणि वांशिक ध्रुवीकरणाचे पायंडेच पडण्याचा हा काळ आला आहे आणि दोन्ही बाजू याला खतपाणी घालत आहेत. पण यातून सौहार्दाला तडे जातात. त्याचे ढळढळीत उदाहरण आपल्याला शेजारी बांगलादेशांत पाहायला मिळेल.

मशिदींमध्ये अजान किंवा नमाज चालू असताना हिंदू मंदिरांनी आरती आणि ध्वनिक्षेपक बंद ठेवावेत, असा विनंतीवजा 'फतवा' तेथील नव्या सरकारने काढला आहे. सौहार्द बिघडले की काय होते, त्याचे हे ताजे उदाहरण.

आपल्याला तशा सापळ्यात अडकायचे नाही. सरन्यायाधीशांच्या घरी पंतप्रधान आरतीसाठी गेले, या घटनेवरून किती गहजब करायचा, याचा विवेक हवा. थयथयाट करणे, हेतू चिकटविणे, घातसूत्रे शोधणे हे राजकारणाचे मार्ग झाले की प्रत्येक गोष्ट वाईट, घातक, विनाशक वाटू लागते आणि ही नकारात्मकता सगळीकडे झिरपते.

सरकारला विरोध करताकरता सौहार्दालाच आपण विरोध करू लागलो नाही ना, याचा विचार करायला हवा. त्या बाबतीतील शहाणपण बिंबवण्याची गरज आहे. गणपतीबाप्पाकडे तूर्त तेवढे तरी मागावे.


# शिवराज्याभिषेकाचा तेजस्वी अध्याय

या युगी.... मऱ्हाटा पातशहा एवढा छत्रपती झाला ही गोष्ट काही सामान्य नाही.... असे म्हणत बखरकार सभासद यांनी एका अभूतपूर्व सोहळ्याचे नेमके वर्णन केले आहे. परकी आक्रमकांच्या जोखडातून मुक्ती देणारा हा मंगलसोहळा म्हणजे शिवराज्याभिषेक. या सोहळ्याने केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण भारतवर्षाचे भवितव्य नव्याने घडविले. त्यामुळेच या प्रसंगाला साडेतीनशे वर्षे झाली असली तरी त्याचे महत्त्व, प्रस्तुतता अद्यापही कमी झालेली नाही. उलट ती आज आणखी सखोलपणे आणि वर्तमानातील नव्या संदर्भासह समजावून घेण्याची आवश्यकता आहे. ही आवश्यकता ओळखून शिवराज्याभिषेकाचे महत्त्व विशद करण्याचे शिवधनुष्य गुरुप्रसाद कानिटकर आणि पराग पिंपळखरे या लेखकद्वयींनी उचलले.

या पुस्तकाची मध्यवर्ती संकल्पना, शिवराज्याभिषेकाचे ऐतिहासिक महत्त्व विशद करणे आणि या सोहळ्याचे समकालीन साधनांच्या आधारे शब्दचित्र रेखाटणे अशी असली तरी, या ऐतिहासिक घटनेची व्याप्ती केवळ काही विधी आणि राजकीय समारंभ एवढीच नाही, ती व्यापक आहे, हे या पुस्तकातून चांगल्याप्रकारे प्रतीत होते.

या दोन्ही लेखकांचे ते यश म्हणावे लागेल. पुस्तकाची सुरुवात 'हिंदवी स्वराज्याची शपथ' या प्रकरणाने होते. अस्सल ऐतिहासिक नोंदी, समकालीन बखरींमधील उल्लेख आणि त्या काळात भारतात आलेल्या परदेशी प्रवाशांच्या नोंदी या साऱ्यांचा आधार घेत लेखकद्वय, हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या संकल्पामागील उदात्त धारणा याची मांडणी या पहिल्या प्रकरणात करतात.

इतिहासअभ्यासकांच्या पिंडाला शोभेल अशा पद्धतीने लेखकांनी काही ऐतिहासिक गैरसमजांबद्दल नव्याने हाती आलेल्या साधनांच्या आधारे परखड विवेचनही केले आहेत. मात्र, इतिहासनिष्ठा जपत असताना वर्तमानात नव्या वादाला तोंड फुटू नये, याचे




भानही लेखकांनी जपले आहे.

ज्या आक्रमकांच्या पातशाह्या आपल्या पंजाखाली चिरडून शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली त्या पातशाह्यांचे वर्णन 'शिवरायांच्या स्वराज्याचे शत्रू' या प्रकरणात केले आहे. यामध्ये लेखकांनी परकी बादशहांचे बलाबल, त्यांचे साम्राज्य, त्यांच्या गुलामीत धन्यता मानणारे काही स्वकीय मांडलिक सरदार आणि या सर्वांशी शिवरायांनी साम-दाम-दंड-भेद वापरून केलेला संघर्ष याचे समकालीन साधनांच्या आधारे वर्णन केले आहे.

या पुस्तकातील वैशिष्ट्यपूर्ण प्रकरण म्हणजे 'सेव्हन पिलर्स ऑफ स्टेटक्राफ्ट'. राजा, अमात्यवर्ग, स्वराज्याचे मित्र, स्वराज्यासाठीचा निधी, राष्ट्रभावना, स्वराज्याचे रक्षण करणारे दुर्ग अर्थात किल्ले आणि सैन्य हे स्वराज्याचे प्रमुख सात स्तंभ मानून तात्त्विक आणि व्यावहारिकदृष्ट्या त्यांचे महत्त्व लेखकांनी उलगडून दाखवले आहे. तर, 'राज्याभिषेकाची आवश्यकता' या प्रकरणात शिवरायांच्या कार्याची व्यापकता, आणि त्याला असलेले देव- देश- धर्माचे आणि लोककल्याणकारी भावनेचे अधिष्ठान याचा व्यापक परामर्श घेण्यात आला आहे. या निमित्ताने मध्ययुगीन कालखंडातील समाज,

देव, राज्य, धर्म यासंबंधीच्या धारणांचीही पुसटशी कल्पना या विश्लेषणातून वाचकांना नक्कीच येते. त्याचप्रमाणे समकालीन साधनांच्या आधारे शिवराज्याभिषेकाचे शब्दचित्रण, तो होत असताना आलेल्या समस्या व त्यावर चतुराईने केलेली मात हे सर्व वाचताना वाचकांना वेगळीच अनुभूती येईल.

मात्र या पुस्तकातील कळसाध्याय असणारी दोन प्रकरणे या पुस्तकाला शाश्वत मूल्य प्राप्त करून देतात. ही दोन प्रकरणे म्हणजे 'एथिक्स ऑफ शिवाजी महाराज' आणि 'द ग्लोरियस कॅरॅक्टर ऑफ शिवाजी महाराज.' शिवरायांची उदात्त मूल्ये, पौर्णिमेच्या चंद्राहूनही शुभ्र असे त्यांचे निष्कलंक चारित्र्य यांविषयी दोन प्रकरणांच्या माध्यमातून समजून घेता येणार आहे.

राज्याभिषेकाचा प्रसंग मध्ययुगातील होणाऱ्या सर्वसाधारण राज्यारोहणाच्या प्रसंगांप्रमाणे सामान्य नव्हता, तर पारतंत्र्याच्या आणि प्रतिकूलतेच्या अंध:कारातून शिवराय आणि त्यांच्या मावळ्यांनी हिंदवी स्वराज्याची मशाल पेटवून पुढील अनेक पिढ्यांना घालून दिलेला तो आदर्श होता, हा विचार या पुस्तकातून वाचकांच्या मनावर ठसतो.

# तारे नसलेल्या रिकाम्या जागा

आपण शेतकरी असलो तरी वेळ काढून आपण लिहून काढलं पाहिजे. आपलं शेतकरी असणं हे शिक्षण फार नसलं की लोकांना जास्त हळहळीचं वाटतं. आपण फार शिकलेलो नसलो, की आपलं शेतकरी असणं लोक लगेच स्वीकारून टाकतात. पण आपण शिकल्यावर तेच आपलं शेतकरी असणं इतरांना रोमँटिकही वाटतं. शिक्षण हे शेतीपासून, गावापासून बाजूला होण्याचं माध्यम बनलं आहे. 'तुम्ही लोकांनी शिकलं पाहिजे', अशी छान मराठीत उच्चारलेली विविध वाक्ये आम्हाला अधूनमधून ऐकू येत राहतात. आपण दुष्काळग्रस्त असतो त्याप्रमाणे मग अभावग्रस्तही होऊन बसतो.

सुरळीत चाललेल्या समाजव्यवस्थेचा भाग बनण्यासाठी वरीलप्रमाणे जी जी क्वालिफिकेशन्स हवी असतात, ती आपल्याकडे नसल्याने आपल्या या विदारक परिस्थितीसाठी नेमकं कोणाला जबाबदार धरायचं, याचाच अंदाज येत नाही आपल्याला. किंवा 'तुम्ही लोकांनी संघर्ष केला पाहिजे', अशी जी वाक्ये आम्हाला ऐकवली जातात, त्यावर तो नेमका कोणाशी, का, कसा करायचा, हे सांगितलं गेलं पाहिजे. नाही म्हणजे, शिक्षण हे भारीच असतं. त्याच्यामुळे आपण भोवतालच्या समाजव्यवस्थेनुसार नेमके कोणत्या पायरीवर आहोत, हे मोजता येणं सोपं जातं.

शिवाय आपल्याला 'शेतकऱ्यांचं काय



चाललंय' हे बाहेरच्या तज्ज्ञांकडून लिहिलेलं वाचता येतं. आपलं नेमकं काय चाललंय, हे आपल्या पद्धतीनं लिहूनही पहाता येतं. अर्थात, आपण आपलं लिहिलेलं रोजचं जगणं हे आपलं आपलं पाच एकरापुरतं असल्यानं ते जगातील इतर शेतकऱ्यांच्या जगण्याशी कसं जोडून पहाता येईल, हा प्रश्न आहेच म्हणा.

खूप फरक असेल. या देशातील इतर शेतकऱ्यांमध्ये नि आपल्यामध्ये. आपण दु:खात आहोत हे लिहून काढलं तर कारण विचारलं जातं. कारणांच्या सक्षमतेवर ठरतं, किती फरक पाडून घ्यायचा ते. कदाचित काहीच फरक न पडण्याचं कारण म्हणजे जगातील शेतकरी दु:खी नसावेत. असलेच तर त्यांना दु:ख नीट सांगता येत नसावं. सांगता येत असेलही कदाचित, पण दु:ख हे आपल्या जीवनाचा भाग आहे, ते जमीन नांगरण्याच्या आड येत नाही, असं वाटून ते सांगत नसावेत. एकुणच गोंधळ आहेच जरा. त्यासाठी आपण हा गोंधळ लिहून काढायला हवा. जगणं लिहिणं तसं सोपंय. गोंधळ कसा लिहिणार? त्याची संगती कशी लावणार? त्या लेखनाला लेखनाचा दर्जा कोण देणार? ते छापलं किंवा सांभाळलं तर गेलं पाहिजे.

पुढच्या पिढ्यांना सातबाराच्या उताऱ्यासोबत ही एक्स्ट्राची काही कागदंही मिळाली, तर जरा सोपी होईल वाटचाल त्यांची. त्यांना आपल्या जयपराजयाचं फार काही वाटणार नाही. किंवा त्यांना उताऱ्यावर इतर हक्कात लिहिलेला 'संघर्ष' हाही वारसा हक्कानं आल्यागत वाटेल. म्हंजे सांगता नाही येणार, की आपण आपलं लिहून काढल्यानं वर्तमान किंवा भविष्यातील शेतकऱ्यांवर काय परिणाम होईल ते, पण लिहायला तर पाहिजे. त्या लेखनाला 'निर्मिती'चा दर्जा मिळो ना मिळो.

तसंही आपलं जगणं आणि निर्मिती या दोन्ही गोष्टी परस्परपूरक आहेत. निर्मिती म्हणजे कदाचित नुसतं लेखन नसेल. जे जे शेतीतून उपजत राहतं किंवा उपजता उपजता राहून जातं, ते ते सगळं निर्मितीचाच भाग. काही शेतमाल बाजारात जातो. काही खायला कामी येतो. काहींचं खत होतं. काही पाखरं खाऊन जातात.

पान १ वरुन...

## महाराष्ट्रात दिवाळीनंतरच विधानसभा...

आता, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी अनौपचारिक चर्चा करताना माहिती दिली की, राज्यात नोव्हेंबरच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या आठवड्यात दोन टप्प्यांमध्ये निवडणुका होतील. त्यामुळे एबीपी माझाच्या बातमीवर खुद्द मुख्यमंत्र्यांनीच शिक्कामोर्तब केले आहे... दरम्यान, राज्यात नोव्हेम्बार महिन्यात निवडणुका घेण्यासंदर्भात काही प्रशासकीय, काही राजकीय तर काही सुरक्षा विषयक कारणं आहेत. त्याचा अभ्यास करूनच एबीपी माझाने २९ ऑगस्ट रोजीच निवडणुकांच्या बाबतीत अचूक बातमी दिली होती.

**राज्यात निवडणुका नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यानंतर का ?**

राज्यात लोकसभा निवडणुकांमध्ये कमी मतदान झालं, त्याचे प्रमुख कारण मतदार याद्यांमधील गोंधळ होता. त्यामुळे प्रशासनाने विधानसभा निवडणुकांच्या पूर्वी मतदार याद्यांमधील चुका दुरुस्त करणे सुरु केले आहे. चुकांची दुरुस्ती, नव्या मतदारांची नोंदणी, यामुळे राज्यातील मतदार याद्या लवकर पूर्ण झाल्या नाहीत. म्हणून हरयाणाचे निवडणूक महाराष्ट्राच्या आधी होत आहे.

## अजित पवारांनी महायुतीत...

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज सकाळी माध्यमांशी बोलताना महायुतीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला कसा असणार? याबाबत भाष्य केलं. ते म्हणाले, 'मला महायुतीमधील तिन्ही नेत्यांचं कौतुक करायचं आहे. काही दिवसांपासून चर्चा आहेत की हा पक्ष १८० जागा लढवणार, तो पक्ष ८० जागा लढवणार, पण आता असं ठरलं आहे की, अशा प्रकारच्या कोणत्याही आकड्यावर जायचं नाही. आता असं ठरलं आहे की, फक्त जिंकण्यासाठी लढायचं आहे. ज्या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट जिंकेल, त्या ठिकाणी त्यांचा आग्रह आम्ही मान्य करणार, तसेच ज्या जागांवर शिवसेना शिंदे गट जिंकेल त्या जागांवर आम्ही त्यांचा आग्रह मान्य करणार, तसेच ज्या मतदारसंघात भारतीय जनता पार्टी जिंकेल, त्या ठिकाणी आमचा आग्रह शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट मान्य करतील. हाच महायुतीचा फॉर्म्युला असणार आहे', असं बावनकुळे यांनी म्हटलं होतं.

## धनगर, धनगड एकच,...

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यासंदर्भात बोलताना म्हणाले की, धनगर समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्यासाठी सकारात्मक पावलं उचलली जातील. हा समावेश कायद्याच्या चौकटीत टिकणारा आणि अन्य कुठल्याही समाजावर अन्याय करणारा नसेल असे प्रयत्न केले जातील. तसेच, यासंदर्भात उत्पादन शुल्क मंत्री शुंभूराज देसाई यांनीदेखील आपली प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, धनगर आणि धनगड एकच आहेत, असा स्वतंत्र जीआर सरकारनं काढावा, अशी मागणी धनगर समाजाची होती. तसा जीआर काढण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. हा जीआर न्यायालयात टिकेल याची काळजी घेतली जाईल.

## मविआत मुख्यमंत्रिपदाच्या...

तरीही हे सरकार तुम्हाला हक्काचे पेन्शन देत नाही. तुमची एकजूट पाहता हे सरकार गेल्यातच जमा आहे. आमचे सरकार आणा, जुनी पेन्शन योजना मी अंमलात आणतो. मी तुमच्या प्रेमाने भारावून गेलो आहे. माझा पक्ष चोरला, चिन्ह चोरले आणि वडीलही चोरले आहेत. तरीही तुम्ही माझ्याकडे मागत आहात. मला सत्तेची पर्वा नाही, मला तुमच्या आयुष्याची चिंता आहे. सत्ता येते आणि जाते, गेलेली सत्ता पुन्हा येणार आहे. मी ती पुन्हा खेचून आणणार आणि तुम्हाला न्याय देणार,' असे आश्वासन ठाकरे यांनी दिले.

'महिलांना दीड हजार रुपये देण्याबरोबरच त्यांची अब्रूही वाचवली पाहिजे', असे सांगत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते शरद पवार यांनी रविवारी राज्य सरकारला लक्ष्य केले. 'देशात गेल्या दहा वर्षांत केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांची वाताहत झाली आहे. कांदा निर्यातबंदीमुळे उत्पादक पूर्णतः हवालदिल झाला आहे. तीच परिस्थिती ऊस उत्पादक व इतर शेतकऱ्यांची झाली आहे,'असे टीकास्त्र त्यांनी सोडले.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग,
राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार, लाल बहादुर शास्त्री मार्ग, मुलुंड (प), मुंबई-४०००८०
ई-मेल पत्ता :- elnorthmumbai.ee@mahapwd.gov.in दूरध्वनी क्रमांक :-०२२-२५६०१३२७

ई-निविदा सुचना क्र. ३२ /२०२४-२५

कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड, मुंबई हे महाराष्ट्र शासनाकडील विद्युत ठेकेदार (लिफाफा क्र.१ अनुसार) यांचे कडून खालील कामाकरिता ब-१ टक्के वारी नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| कामाचे नाव : | निविदा रक्कम रूपये : |
| --- | --- |
| १. अंदाजपत्रक क्र.एसडीआर/एनएम/एमएसएसडी/एनएमएस/२३००९/२०२३-२४, जुने महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील संलग्नक इमारतीमधील खोल्यांच्या नागरी नूतनीकरणामुळे विद्युत वायरिंग ,LED लाईट , टेलिफोन नेटवर्क बदलणे (मागणी दुसरी) | रूपये २७६६४२९/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि.१९.०९.२०२४ ते दि.२६.०९.२०२४ रोजी १७.३०वा.पर्यंत.
ई निविदा उघडणे : दि.२७.०९.२०२४ रोजी १४.०० वा.नंतर.
(सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण २२,/प्र.क्र १०४/इमा-२ मंत्रालय ,मुंबई दि.२८.०६.२०२४)
खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्धआहे.
१.वरील अंदाजित रक्कमेत जी.एस..टी. सामाविष्ट नसून ठेकेदाराने निविदेत दर भरताना जी.एस..टी.वगळून दर नमूद करावा.अंदाजित रक्कमेवर नमूद केलेल्या दरानुसार आलेल्या रक्कमेवर जी.एस..टी.१८% वेगळा अदा करण्यात येईल.
२.http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही वदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल.)
३. कामाच्या करारनाम्यात पोस्ट क्वॉलिफी केशनचा क्रायटेरिया समाविष्ट केलेला आहे.
४. कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड (प), मुंबई कार्यालयातील सूचना फलक.
जा.क्र.काअ/उमुंविवि/निविदा/ २५५५ /२०२४ दिनांक: १०.०९.२०२४

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/३०२०

सही
कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई विद्युत विभाग,
सा.बां.विभाग, मुंबई.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग,
राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार, लालबहादुर शास्त्री मार्ग, मुलुंड (प), मुंबई-४०००८०
ई-मेल पत्ता :- elnorthmumbai.ee@mahapwd.gov.in दूरध्वनी क्रमांक :-०२२-२५६०१३२७

ई-निविदा सुचना क्र. ३०/२०२४-२५

कार्यकरी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड, हे मुंबई खालील सुचीवध्द केलेल्या तत्सम प्रकारची कामे यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या महाराष्ट्र सरकारने जारी केलेल्या वैध विद्युत कंत्राटदार परवाना असलेल्या विद्युत कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता ब-१ टक्केवारी नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| कामाचे नांव : | निविदा रक्कम रूपये : |
| --- | --- |
| १) अंदाजपत्रक क्र.ओडब्लू/एईएसडी/ए१/२४४३३/२०२३-२४,अंधेरी (प.) मुंबई येथील वर्सोवा समुद्रकिनारी सुशोभिकरणाच्या दृष्टीने विद्युतीकरण , सजावटीचे खांब व दिवे, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बसवणे आणि सार्वजनिक ध्वनी प्रणाली, एस.पी.वी.सौर/पवन संकरित अक्षय ऊर्जा संयंत्र इ. यंत्रणा बसविणे | रूपये २७३०६२७३/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि.१३.०९.२०२४ ते दि.२८.०९.२०२४ रोजी संध्याकाळी १७.३० पर्यंत.
व्हिडीओ कॉन्फरन्सींग निविदापूर्व बैठक : दि.२०.०९.२०२४ (बैठकीचे ठिकाण- मुख्य अभियंता,चौथा मजला सार्वजनिक बांधकाम विभाग,मुंबई मर्जबान पथ,फोर्ट मुंबई वेळ : दुपारी १४.३० वाजता.
ई निविदा उघडणे : दि.३०.०९.२०२४ रोजी सकाळी १२.३० नंतर.
खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

६. http://mahatenders.gov.in
(सदर निविदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
७. कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड (प), मुंबई कार्यालयातील सूचना फलक.
८. कामाच्या करारनाम्यात पोस्ट क्वॉलिफीकेशनचा क्रायटेरिया समाविष्ट केलेला आहे.
९. ई-निविदा पोर्टलवर "बीड लॉक" झाल्यानंतर निविदांबाबत " हार्ड कॉपी" १ प्रतीत कंत्राटदारांनी निविदा सादर करावयाच्या वेळेपासून ७२ तासात कार्यकारी अभियंता, मुलुंड विद्युत विभाग, मुंबई यांचे कार्यालयात सादर करणे अनिवार्य आहे.
१०. ऑनलाईन ई-निविदा प्रक्रियायेमध्ये काही अडचण निर्माण झाल्यासच सदर निविदा (हार्ड कॉपी) दि.२८.०९.२०२४ रोजी उघडण्यात येईल.

जा.क्र.काअ/उमुंविवि/निविदा/ २५२८ /२०२४
दिनांक ०९.०९.२०२४

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/३०१८


कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई विद्युत विभाग,
सा.बां.विभाग, मुलुंड, मुंबई.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# गणेशोत्सवानंतर धारावीकर अदानीविरोधात रस्त्यावर उतरणार

■ मुंबई : गणेश बागडे

धारावी पुनर्विकासाचे गुपचूप भूमिपूजन केल्याने अदानी समूह, धारावी रिडेव्हलपमेन्ट प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड (डीआरपीपीएल) विरोधात धारावीकरांमध्ये रोष पसरला आहे. या पार्श्वभूमीवर अदानी समूहाविरोधातील आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय धारावी बचाव आंदोलनाने घेतला आहे. त्यानुसार आठवड्याभरात धारावी बचाव आंदोलनाची एक महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. या बैठकीत आंदोलनाची रूपरेषा निश्चित करण्यात येणार आहे. सर्व मुंबईकरांना एकत्रित करून मोर्चा काढण्याचे धारावी बचाव आंदोलनाचे नियोजन आहे. याबाबतच निर्णय धारावी बचाव आंदोलनाच्या बैठकीत घेण्यात येणार आहे. अदानी समुहाच्या माध्यमातून धारावीचा पुनर्विकास करण्यास धारावीकरांनी सुरुवातीपासूनच विरोध केला आहे. त्याचवेळी ३५० ऐवजी ५०० चौरस फुटांच्या घराची धारावीकरांनी मागणी केली आहे. राज्य सरकार वा धारावी पुनर्विकास प्रकल्पाने (डीआरपी) या मागणीवर अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या अंतिम आराखड्यासही अद्याप मान्यता मिळालेली नाही. असे असताना बेकायदेशीररित्या, लपूनछपून अदानी समूहाने, डीआरपीपीएलने गुरुवार, १२ सप्टेंबर रोजी रेल्वेच्या जागेवरील रेल्वे कर्मचाऱ्यांच्या इमारतीच्या



बांधकामाचे भूमिपूजन केल्याचा आरोप धारावी बचाव आंदोलनाचा आहे. दरम्यान, भूमिपूजनाचा सोहळा उधळण्यासाठी धारावी बचाव आंदोलनाने ११ सप्टेंबर रोजी लाक्षणिक उपोषण सुरू केले होते. या उपोषणाचा धसका घेत गुरुवारचे भूमिपूजनाचा कार्यक्रम रद्द करण्यात आल्याचे डीआरपीने अधिकृतपणे पोलिसांना कळविले होते. त्यामुळे पोलिसांच्या मध्यस्थीनंतर धारावी बचाव आंदोलनाने आपले लाक्षणिक उपोषण मागे घेतले होते. मात्र उपोषण मागे घेतल्यानंतर दुसऱ्या दिवशी, गुरूवारी सकाळी १०.३० वाजता डीआरपीपीएलने गुपचूप भूमिपूजन केले. यासंबंधीची अधिकृत घोषणाही केली. डीआरपीपीएलच्या कृतीवर धारावीकरांनी जोरदार टीका केली आहे. लपूनछपून भूमिपूजन का करण्यात आले, असा प्रश्न उपस्थित करून आता अदानी आणि डीआरपीपीएलविरोधातील आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय धारावी बचाव आंदोलनाने घेतला आहे.

## वादग्रस्त वक्तव्याचे प्रकरणः जितेंद्र आव्हाडांविरोधात गुन्हा नोंदवण्याच्या मागणीचा पुनर्विचार करा, उच्च न्यायालयाचे ठाणे न्यायदंडाधिकाऱ्यांना आदेश

■ मुंबई : यश सावंत

सहा वर्षांपूर्वी राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) नालासोपारा येथून हस्तगत केलेला स्फोटकांचा साठा हा राज्यातील मराठा नेत्याच्या घातपातासाठी होता, असे वक्तव्य शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केले होते. या वक्तव्याप्रकरणी आव्हाड यांच्याविरोधात गुन्हा नोंदविण्याची मागणी करणाऱ्या अर्जाचा पुनर्विचार करा, असे आदेश उच्च न्यायालयाने ठाणे जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्यांना दिले आहेत.

हिंदू कृती दलाचे नेते आणि वकील कुश खंडेलवाल यांनी ठाणे न्यायदंडाधिकाऱ्यांच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. तसेच, वादग्रस्त वक्तव्य करून दोन गटांमध्ये सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्याची मागणी केली होती. न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांच्या खंडपीठाने



खंडेलवाल यांच्या मागणीचा पुनर्विचार करण्याचे आदेश ठाणे महानगरदंडाधिकाऱ्यांना दिले. एटीएसने २०१८ मध्ये नालासोपारा येथून गोरक्षक वैभव राऊत याला अटक केली होती. तसेच, नालासोपारा येथील त्याच्या घरातून स्फोटकेही हस्तगत केली होती. हिंदूराष्ट्र निर्माण करण्यासाठी आणि देशाचे सार्वभौमत्व आणि अखंडता धोक्यात आणण्यासाठी दहशतवादी हल्ल्याचा कट रचल्याच्या आरोपांतर्गत वैभव याच्यासह इतर आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला. परंतु, तपास प्रगती पथावर असतानाच या स्फोटकांचा एका मराठा नेत्याच्या घातपातासाठी वापर करण्यात येणार होता, असे वक्तव्य आव्हाड यांनी केले. त्यांच्या या वक्तव्यानंतर खंडेलवाल यांनी पोलिसांकडे तक्रार करून दोन गटांत तेढ निर्माण केल्याप्रकरणी आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. पोलिसांनी त्यास नकार दिल्याने खंडेलवाल यांनी ठाणे न्यायदंडाधिकाऱ्यांकडे दाद मागितली.

## कापूस, सोयाबीन उत्पादकांना १६०० कोटींची मदत

■ मुंबई : नितीन देवळेकर

गतवर्षाच्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना १६०० कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय सरकारने घेतला असून या मदतीचे तातडीने वितरण करण्याचे आदेश कृषी आयुक्तांना शुक्रवारी देण्यात आले आहेत.



महायुती सरकारने २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट एक हजार रुपये तर दोन हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रति हेक्टर रुपये पाच हजार (दोन हेक्टरच्या मर्यादेत) अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी घेतला होता. त्यानुसार कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक हजार ५४८ कोटी रुपये, तर सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी दोन हजार ६४६ कोटी रुपये असे एकूण चार हजार १९४ कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून मंजूर करण्यात आले होते.

मात्र वित्त विभागाने मंजूर पुरवणी मागणीच्या ६० टक्केच्य मर्यादेतच म्हणजे दोन हजार ५१६ कोटी ८० लाख रुपये निधी उपलब्ध करून देत त्याच्या वितरणास गेल्याच आठवड्यात परवानगी दिली होती. अपुऱ्या निधीमुळे काही भागांत कापूस आणि सोयाबीन उत्पादकांना अर्थसाह्य मिळू शकले नव्हते. त्याबाबत शेतकऱ्यांनी तसेच लोकप्रतिनिधींनी नाराजी व्यक्त केल्यानंतर वित्त विभागाने आणखी एक हजार ६०० कोटी रुपये मदतीच्या प्रस्तावास मान्यता दिली असून त्यानुसार हा निधी कृषी आयुक्तांना पाठविण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णयही जारी करण्यात आल्याची माहिती कृषी विभागातील अधिकाऱ्याने दिली.

## शासकीय भूखंडावरील सर्वच गृहनिर्माण संस्थांना मालकी हक्कासाठी समान शुल्क!

■ मुंबई : सम्यक कासारे

शासकीय भूखंडावरील सर्वच गृहनिर्माण संस्थांना मालकी हक्क (भोगवटादार दोन मधून धारणाधिकार एकमध्ये रुपांतर) बहाल करण्यासाठी आता यापुढे समान शुल्क आकारले जाणार आहे. याआधी वैयक्तिक वा संस्थेला वितरीत केलेल्या भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांना शीघ्रगणकाच्या (रेडीरेकनर) २५ टक्के शुल्क आकारले जात होते. ते आता



शासकीय भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थेला लागू असलेल्या शीघ्रगणकाच्या दहा टक्के इतकेच शुल्क आकारले जाणार आहे. यामुळे अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांना दिलासा मिळाला आहे.

राज्यात भाडेपट्टा (लीज) आणि कब्जेहक्काच्या (ऑक्युपन्सी) २२ हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. मुंबईत भाडेपट्ट्याच्या १५०० ते १६०० तर राज्यात १८०० सहकारी गृहनिर्माण संस्था तर कब्जेहक्काच्या मुंबईत १४०० ते १५०० सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या संस्थांना मालकी हक्क देण्यासाठी राज्य शासनाने अधिसूचना जारी करून वैयक्तिक भूखंडधारकांना शीघ्रगणकाच्या २५ टक्के तर सहकारी गृहनिर्माण संस्थांना शीघ्रगणकाच्या १५ टक्के रक्कम भरुन मालकी हक्क मिळणार होता. त्यात बदल करून फक्त सहकारी गृहनिर्माण संस्थांना खासगी विकासकाने पुनर्विकास केल्यास दहा टक्के तर स्वयंपुनर्विकास केल्यास पाच टक्के रक्कम भरून मालकी हक्क दिला जाणार होता. परंतु वैयक्तिक वा संस्थेला दिलेला भूखंड सहकारी गृहनिर्माण संस्थेला अधिकृत वा अनधिकृतपणे हस्तांतरित झालेला असला तरी मालकी हक्क देण्यासाठी शीघ्रगणकाच्या २५ टक्केच रक्कम आकारली जात होती. याबाबत शहर जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे पत्र पाठवून विचारणा केली होती. याबाबत महसूल विभागाने स्पष्टीकरण दिले असून अशा भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांकडूनही शीघ्रगणकाच्या दहा टक्के रक्कम आकारण्यास अनुमती दिली आहे. स्वयंपुनर्विकास करणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना पाच टक्के रक्कम आकारली जाणार आहे. शासकीय भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांना मालकी हक्क देण्याबाबत दिलेली मुदत ३० सप्टेंबर रोजी संपुष्टात येत आहे.

## कागदाच्या लगद्यापासून गणेशमूर्ती! वजनदार मूर्तींना पर्याय; गिरगावातील सार्वजनिक मंडळांचा पर्यावरणपूरक उत्सवासाठी पुढाकार

■ मुंबई : नितीन देवळेकर

केंद्रीय पर्यावरण प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्लास्टर ऑफ पॅरिसवर बंदी घालण्यापूर्वीच गिरगाव आणि आसपासच्या परिसरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी काही वर्षे आधीच शाडूच्या मातीपासून पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती घडविण्यास सुरुवात केली होती. मात्र, वजनदार गणेशमूर्ती विसर्जनस्थळी नेण्यात येणाऱ्या समस्या लक्षात घेऊन यंदा काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी कागदाच्या लगद्यापासून पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती साकारली आहे. त्यात अखिल मुगभाट सार्वजनिक श्री गणेशोत्सव मंडळ आणि खिल खोताची वाडी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा समावेश आहे.

मुंबईमधील गिरगाव परिसरातील मुगभाट येथे तब्बल ९३ वर्षांपूर्वी १९३२ मध्ये अखिल मुगभाट सार्वजनिक श्री गणेशोत्सव मंडळाची स्थापना झाली. पारतंत्र्यकाळात सुरू झालेल्या या गणेशोत्सवात सांस्कृती, प्रबोधनपर कार्यक्रमांवर भर देण्यात





येत होता. भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि कालौघात गणेशोत्सावाचे स्वरुप बदलेत गेले. काळानुरुप या मंडळाच्या कार्यक्रमांची रुपरेषा बदलत गेली. मंडळातील काही तरुणांनी १९८१ मध्ये 'भारतीय संस्कृती आणि तिचा विस्तार' या संकल्पनेवर गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला.

मुंबईकरांना देश-विदेशातील गणेशमूर्तींचे दर्शन घडविण्याचा संकल्प मंडळाने सोडला. मंडळाने १९८१ पासून २००२ पर्यंतच्या काळात दरवर्षी विदेशातील, तसेच महाराष्ट्राच्या अन्य भागातील प्रसिद्ध गणेशमूर्ती साकारली. चिन, जपान, कम्बोडिया, श्रीलंका, भूतान आदी देशांमधील, तसेच महाराष्ट्रातील हेदवी, वाई येथील प्रसिद्ध गणपतीची २० – २१ फूट उंच मूर्ती साकारली होती. देश-विदेशातील गणेशमूर्तींचे दर्शन घडविणारे हे गणेशोत्सव मंडळ अल्पावधीतच मुंबईकरांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू बनले. मात्र २००८ मध्ये उंच गणेशमूर्ती विसर्जनासाठी गिरगाव चौपाटीवर नेण्यात आली. मात्र गिरगाव चौपाटीवर पोहोचल्यानंतर अचानक ट्रॉलीचे चाक निखळले आणि उंच गणेशमूर्ती कोसळली. मूर्तीखाली दोन कार्यकर्ते चिरडले गेले.

## जोगेश्वरीतील पीएमजीपी वसाहतीच्या पुनर्विकासासाठी पुनर्निविदा

■ मुंबई : सम्यक कासारे

**जोगेश्वरी येथील पीएमजीपी वसाहतीच्या पुनर्विकासासाठी म्हाडाच्या मुंबई मंडळाने खासगी विकासकाची नियुक्ती करण्यासाठी निविदा मागविल्या होत्या. या निविदेस अनेकदा मुदतवाढ देऊनही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे अखेर मुंबई मंडळाने पीएमजीपी वसाहतीच्या पुनर्विकासासाठी पुन्हा नव्याने निविदा प्रसिद्ध केली आहे.**

केंद्र सरकारच्या विशेष योजनेअंतर्गत मुंबईत विविध ठिकाणी पीएमजीपी वसाहती उभारण्यात आल्या आहेत. त्यापैकी एक पीएमजीपी वसाहत जोगेश्वरीमध्ये आहे. जोगेश्वरी येथील २७,७२५ चौरस मीटर जागेवर १९९० मध्ये पीएमजीपी वसाहत उभारण्यात आली. या वसाहतीत चार मजली १७ इमारतींचा समावेश आहे. यात ९४२ निवासी आणि ४१ अनिवासी गाळे आहेत. काही वर्षातच या इमारतींची पुरती दूरवस्था झाली असून या इमारती अतिधोकादायक बनल्या आहेत. त्यामुळे पुनर्विकासाचा निर्णय घेत सोसायटीने श्रीपती समूहाची विकासक म्हणून नियुक्ती केली. मात्र या विकासकाने १० वर्षांमध्ये पुनर्विकासाची एक वीटही रचली नाही. त्यामुळे शेवटी विकासकाची नियुक्ती रद्द करण्यात आली असून या वसाहतीचा पुनर्विकास रखडला आहे. या इमारतींच्या तात्काळ पुनर्विकासाची गरज असून या इमारतींची संरचनात्मक तपासणी केली असता इमारती अतिधोकादायक झाल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. यानंतर मुंबई मंडळाने या इमारतींमधील रहिवाशांना संक्रमण शिबिरातील गाळे उपलब्ध करून दिले. काही रहिवाशी संक्रमण शिबिरात स्थलांतरित झाले, पण आजही मोठ्या संख्येने रहिवाशी या इमारतीत वास्तव्यास आहेत. एकूणच या इमारतींची दुरवस्था पाहता मोतीलालनगर पुनर्विकासाच्या




धर्तीवर सी. अँड डी. ए. प्रारुपाप्रमाणे या इमारतींच्या पुनर्विकासाचा निर्णय मंडळाने घेतला.

या निर्णयाप्रमाणे मंडळाने काही महिन्यांपूर्वी विकासकाच्या नियुक्तीसाठी निविदा प्रसिद्ध केल्या. मात्र प्रतिसाद न मिळाल्याने तीन वेळा निविदेस मुदतवाढ देण्यात आली. १९ ऑगस्ट रोजी शेवटची मुदत संपुष्टात आली आणि या शेवटच्या मुदतीतही निविदेला प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे अखेर निविदेत काही बदल करून मंडळाने शनिवारी नव्याने या वसाहतीच्या पुनर्विकासासाठी निविदा मागविल्याची माहिती मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.आता या निविदेस प्रतिसाद मिळाला तरच जोगेश्वरीतील १७ इमारतींचा पुनर्विकास मार्गी लागेल. अन्यथा पुढे काय करायचे याचा निर्णय राज्य सरकारला घ्यावा लागणार आहे.

## गणेशोत्सवादरम्यान श्रवण क्षमतेच्या समस्यांमध्ये ४० टक्क्यांनी वाढ!

■ मुंबई : राकेश गायकवाड

लहानांपासून थोरामोठ्यांपर्यंत सर्वच वयोगटातील नागरिकांमध्ये श्रवण क्षमतेच्या आणि श्वसनाच्या समस्यांमध्ये वाढ झाली आहे. गणेशोत्सवादरम्यान होणाऱ्या कानठळ्या बसणाऱ्या आवाजामुळे श्रवण क्षमतेच्या समस्या तर आगमन सोहळा, विसर्जन सोहळा, मिरवणुकांदरम्यान फोडण्यात येणाऱ्या फटाक्यांमुळे श्वसनांसंबंधी विकारांची वाढ होत आहे.

अशा समस्यांनी त्रासून रुग्णालयात भेट देणाऱ्या आठ रुग्णांपैकी चार ज्येष्ठ नागरिक, दोन प्रौढ आणि दोन तरुणांचा समावेश असल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली आहे. त्याचप्रमाणे, फटाक्यांमधून सोडल्या जाणाऱ्या रसायनांच्या श्वासोच्छवासामुळे लोकांमध्ये ब्रॉन्कायटिस आणि दमा यांसारख्या श्वसनाच्या समस्या वाढतात.

उत्सवादरम्यान असलेल्या मोठ्या आवाजामुळे श्रवणशक्ती कमी होते. यामुळे ऐकु येण्यात अडचणी, शब्दांचा चुकीचा अर्थ लावणे किंवा उच्च आवाजात वाजवलेली गाणी आणि व्हिडिओंचा आनंद न घेता येणे अशा समस्या आढळतात. कानाच्या आतील पेशींना झालेल्या नुकसानीमुळे तात्पुरता किंवा कायमचा श्रवणदोष निर्माण होऊ शकते. काही लोकांना टिनिटस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तसेच कानात घंटी वाजणे, गोंधळ ऐकू येणे किंवा शिट्टी वाजणे असे आवाज येत राहतात.

सामान्यपणे ८० डेसिबलपर्यंतचा आवाज सहन होतो मात्र १०० ते १२० डेसिबलच्या आवाजामुळे कानावर दुष्परिणाम होऊ शकतो. अर्थात हा आवाज खुल्या मैदानात आहे की अरुंद गल्लीमध्ये आहे तसेच कितीवेळ आवाज सहन करावा लागला यावरही श्रवणशक्तीवर किती परिणाम होतो याचा विचार करावा लागेल असे जे.जे. रुग्णालयाच्या कान-नाक-घसा विभागाचे प्रमुख डॉ श्रीनिवास चव्हाण यांनी सांगितले. बंद खोलीत



८० डेसिबल आवाजाचाही श्रवणावर परिणाम होऊ शकतो असेही ते म्हणाले. गणेशमंडळांनी डिजे वाजवताना योग्य ती काळजी घेणे आवश्यक असून किमान स्पिकर जरी उंचावर लावले तर लोकांना त्याचा कमी त्रास होईल असे डॉ चव्हाण म्हणाले. कानठळ्या बसणार्या आवाजामुळे श्रवणशक्तीवर निश्चित दुष्परिणाम होतो असेही ते म्हणाले.

मुंबईतील अपोलो स्पेक्ट्रा रूग्णालयातील कान-नाक-घसा विकार तज्ज्ञ डॉ. प्रशांत केवले म्हणाले की, उत्सवादरम्यान मोठ्या आवाजामुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषणामुळे वेगवेगळ्या वयोगटातील लोकांच्या कानाचे नुकसान झाल्याचे दिसून येते. ध्वनी आणि वायू प्रदूषणाच्या वाढत्या समस्येमुळे तरुण, प्रौढ आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये श्रवण क्षमता आणि श्वसनाच्या समस्यांमध्ये ४० टक्के वाढ झाली आहे. फटाक्यांमधून सोडल्या जाणाऱ्या रसायनांच्या श्वासोच्छवासामुळे लोकांमध्ये ब्रॉन्कायटिस आणि दमा यांसारख्या श्वसनाच्या समस्या वाढतात. दररोज, आठ लोकांपैकी पाच ज्येष्ठ नागरिकांना श्वासोच्छवासाचा त्रास, दोन प्रौढांना (२५ ते ५५ वयोगट) छातीत घरघर आणि एका तरुणाला(वय २० ते २५ वयोगट) खोकल्याची समस्या उद्भवते. उत्सवादरम्यान ध्वनी आणि वायू प्रदूषण दोन्हीमुळे एखाद्याच्या जीवनाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो आणि दैनंदिन कामात व्यत्यय येतो. दारे आणि खिडक्या बंद करा आणि जास्त आवाज अथवा प्रदुषण असताना बाहेर न पडता घरी रहा. मुंबईतील झायनोव्हा शाल्बी रूग्णालयातील ईएनटी तज्ज्ञ डॉ. भाविक शहा म्हणाले की, सणासुदीच्या काळात डीजेच्या आवाजामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि गर्भवती महिलांना खूप त्रास होऊ शकतो. या मोठ्या आवाजामुळे वृद्ध रुग्णांना मोठा आवाजाचा धक्का सहन न झाल्याने विविध समस्यांचा सामना करावा लागतो.

## मराठा आरक्षणावर विशेष अधिवेशन; आमदार राजेंद्र राऊत यांचे संकेत

■ मुंबई : विशाल कारंडे

मराठा आरक्षण प्रश्नावर राज्य विधिमंडळाचे विशेष अधिवेशन तत्काळ बोलवावे, या मागणीसाठी बार्शीत भाजप पुरस्कृत अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांनी सुरू केलेले ठिय्या आंदोलन तिसऱ्या दिवशीही सुरूच होते. विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावण्यासंबंधी महायुती शासनाकडून अधिकृत निर्णय झाला नसला तरी हे विशेष अधिवेशन लवकरच होणार असल्याचे संकेत आमदार राऊत यांनी दिले आहेत. दरम्यान, सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी बार्शी येथील आंदोलनस्थळी धाव घेऊन आमदार राऊत यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या चर्चेतून फारसे काही साध्य झाले नसल्याचे कळते. बार्शीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर आमदार राऊत गेल्या तीन दिवसांपासून शेकडो



समर्थकांसह ठिय्या आंदोलन करीत आहेत. मराठा आरक्षण प्रश्नावर सुरुवातीला त्यांनी आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्यावर टीकास्त्र सोडले. दुसरीकडे जरांगे यांनीही आमदार राऊत यांचा बोलविता धनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच असल्याचा प्रत्यारोप करून त्यांचे आव्हान स्वीकारले आहे. दरम्यान मराठा आरक्षण प्रश्नावर आपली आणि जरांगे यांची भूमिका एकच असल्याचा दावा आमदार राऊत यांनी केला आहे.

ठिय्या आंदोलनस्थळी बोलताना आमदार राऊत यांनी मराठा आरक्षण प्रश्नावर विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावण्यासाठी सभापती राहुल नार्वेकर यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा झाल्याचे सांगितले. सर्व पक्षांच्या आमदारांनाही निरोप दिला जात असून मराठा आरक्षण प्रश्नावर निर्णायक धोरण स्वीकारण्याची वेळ आल्याचे त्यांनी सांगितले.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग, मुंबई.**

**ई निविदा सूचना क्रमांक : १४/२०२४-२५**

कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, मुंबई हे सा.बां.विभागात नोंदणीकृत/अनुभवी ठेकेदार यांचेकडून कामांच्या ऑन लाईन ई निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना कार्यकारी अभियंता, https://mahapwd.gov.in या संकेत स्थळावर दिनांक १३.०९.२०२४ वेळ दुपारी ०१.०० ते २७.०९.२०२४ वेळ दुपारी ०१.०० पर्यंत ऑन लाईन डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध होतील. तसेच शक्य असल्यास ऑन लाईन ई निविदा कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई हे दिनांक ३०.०९.२०२४ वेळ दुपारी ०२.०० वाजता उघडतील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकारांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टीप : निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारांनी क्लास D व त्यावरील डिजिटल सिगनेचर आणि वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर निविदा संदर्भात सर्व दस्ताऐवज ऑन लाईन सादर करणे करिता स्वतः नाव नोंदणी करून घ्यावी. वरील निविदा सूचनेमध्ये एकूण ४९ कामे समाविष्ट असून सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर निविदा सूचना पहावयास मिळेल. कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास नोटीसची प्रत विनामुल्य मिळू शकेल.

**(उपरोक्त काम हे ३ ते १० लाखामधील आहे.)**

जा.क्र.काअ/दमुविवि/निविदा/५२०४/२०२४-२५
दि. ०६.०९.२०२४

-sd-
कार्यकारी अभियंता,
दक्षिण मुंबई विद्युत विभाग,
सा.बां.विभाग, मुंबई.

**डीजीआयपीआर/२०२४-२०२५/२९३६**

# कचरा विल्हेवाट प्रक्रियेला वेग; पालिकेकडून सव्वा दोन लाख मॅट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट

■ वसई : सुचिता देशमुख

पालिकेच्या कचरा भूमीवरील कचऱ्याचे साचलेले डोंगर कमी करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. बायोमायनिंग प्रकल्पाच्या द्वारे आतापर्यंत सव्वा दोन लाख मॅट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली आहे.अजूनही संपूर्ण कचरा नष्ट करण्यासाठी दोन वर्षे इतका कालावधी लागणार आहे. वसई विरार शहरात वाढत्या नागरिकरणामुळे दैनंदिन निघणारा कचऱ्याचे प्रमाण वाढले आहे.दररोज शहरातून आठशेहून अधिक मॅट्रिक टन इतका कचरा संकलित करून गोखीवरे येथील कचरा भूमीवर नेऊन टाकला जात आहे. यापूर्वी कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी पालिकेचा कोणताही प्रकल्प नसल्याने विल्हेवाटीसाठी अडचणी निर्माण झाल्या होत्या.त्यामुळे एका वर एक असे कचऱ्याचे ढिगारे साचून त्याचे डोंगर तयार झाले होते.या वाढत्या कचऱ्यामुळे कचरा टाकण्यास ही पालिकेला जागा अपुरी पडत होती. या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने कचरा भूमीवर बायोमायनिंग प्रकल्प सुरू केला आहे. मे साई युटिलिटी या संस्थेला वीस वर्षासाठीचे काम देण्यात आले आहे. सुमारे १५ लाख मॅट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे काम १५ जानेवारी पासून सुरू करण्यात आले आहे. ट्रॉमल यंत्रणेद्वारे कचऱ्याचे वर्गीकरण करण्यात येते. त्यानंतर त्यावर प्रक्रिया करून विल्हेवाट लावली जात आहे. या विल्हेवाट प्रक्रियेला वेग आला आहे. विल्हेवाटीसाठी ३ ट्रॉमल यंत्र




असून त्याद्वारे काम सुरू आहे. आतापर्यंत पालिकेच्या कचरा भूमीवरील सव्वा दोन लाख मॅट्रिक टन इतक्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली असल्याचे पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने सांगितले आहे.उर्वरित कचऱ्यावर टप्प्या टप्प्याने विल्हेवाट लावली जात आहे संपूर्ण कचरा मोकळा करण्यासाठी साधारणपणे दोन वर्षे इतका कालावधी लागेल असे पालिकेचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी सांगितले आहे.

याआधी कचरा पडून असल्याने रासायनिक वायू तयार होऊन आगी लागण्याच्या घटना घडत होत्या. त्याचा धूर हवेत सर्वत्र पसरत असल्याने नागरिकांचा कोंडमारा होत होता. आता कचरा हळू हळू कमी होत असल्याने कचऱ्याला आगी लागण्याचा घटना कमी होणार आहेत तर दुसरीकडे दुर्गंधीचे प्रमाण कमी होणार आहे. वसई विरार शहराच्या वाढत्या अनधिकृत चाळी यामुळे अनेक ठिकाणच्या मुख्य रस्त्यावर व सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर कचरा टाकण्याचे प्रकार सुरूच आहेत.यापूर्वी पालिकेने सर्वाधिक कचरा टाकण्याची ठिकाणांचे सर्वेक्षण करून त्याठिकाणी विविध कलाकृती साकारून ते कमी करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र त्यानंतरही अनेक ठिकाणी कचरा टाकण्याचे प्रकार सुरुच आहेत. हा कचरा रोखण्याचे मोठे आव्हान पालिकेच्या समोर आहे. कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे काम सुरू आहे. आतापर्यंत सव्वा दोन लाख मॅट्रिक टन कचऱ्यावर विल्हेवाट प्रक्रिया झाली आहे. कचरा कमी करून जागा मोकळी करण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत.-

# उल्हासचे प्रदुषित पाणी मराठवाड्याला नेणार का? पर्यावरणप्रेमींचा सवाल, उल्हास, वैतरणाचे पाणी मराठवाड्यात नेण्याच्या निर्णयावर नाराजी

■ बदलापूर: आकाश कांबळे

उल्हास आणि वैतरणा उपखोऱ्यातील अतिरिक्त पाणी मराठवाडा प्रदेशातील गोदावरी खोऱ्यात वळवण्यासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी राज्य सरकारने ६१ कोटींना मंजूरी दिली आहे. मात्र आधीच प्रदुषणामुळेप् गटारगंगा होण्याच्या वाटेवर असलेल्या उल्हास नदीचे प्रदुषित पाणी मराठवाड्याला नेणार का असा संतप्त सवाल उल्हास नदी बचाव कृती समितीने उपस्थित केला आहे. आधी नदी प्रदुषण थांबवण्याची गरज असल्याचीही भावना पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे. पश्चिम वाहिनी खोऱ्यातील उल्हास नदी खोऱ्यातील ३४.८० टीएमसी तर वैतरणा खोऱ्यातून १९.९० टीएमसी असे एकूण ५४.७० टीएमसी अतिरिक्त पाणी वळविणे दुष्काळग्रस्त मराठवाडा प्रदेशातील गोदावरी खोऱ्यात वळवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी जलसंपदा विभागाने नुकताच शासन निर्णय जाहीर केला आहे. त्यासाठी ६१ कोटी ५२ लाखांच्या अंदाजपत्रकाला मान्यता दिली आहे. त्यामुळे या प्रकल्पाचा सविस्तर अभ्यास होणार आहे. मात्र याच निर्णयावर बोट ठेवत उल्हास नदी बचाव कृती समितीने उल्हास नदीच्या प्रदुषणाच्या मुद्द्यावर लक्ष वेधले आहे. जागोजागी सांडपाणी, रसायन मिश्रित सांडपाणी नाले आणि ओढ्यांच्या माध्यमातून उल्हास



नदीत दररोज मिसळत आहे. त्यातच नदी पात्रात आणि किनारी भागात अनाधिकृत बांधकामांमुळे नदीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. या नद्यांच्या प्रदुषणावर तोडगा काढण्यात अद्याप राज्य सरकारला यश आलेले नाही. त्यात दरवर्षी जलपर्णीच्या समस्येमुळे पाण्याची पातळी खालावते आहे. पूर रेषा आणि ना बांधकाम क्षेत्रावरून शासन दरबारीच स्पष्टता नाही. अशा परिस्थितीत या प्रदुषित नदीचे पाणी मराठवाड्याला वळवण्याचे पाप करू नका, असे मत उल्हास नदी बचाव कृती समितीच्या सदस्यांनी व्यक्त केले आहे. समितीचे रविंद्र लिंगायत यांनी, गुरूवारी उल्हास आणि तिच्या उपनद्या प्रशासन तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नाकर्तेपणामुळे वालधुनी नदीसारख्या मृत होत आहेत.

# दिवा, भांडर्लीची जमीन होणार कचरामुक्त? कचराभुमीवरील कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली जाणार

■ ठाणे : तृप्ती गोरे

दिवा आणि भांडर्ली परिसरातील कचराभुमी ठाणे महापालिकेने बंद केली असली तरी त्याठिकाणी कचऱ्याचे ढिग कायम असून या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावून तेथील जमीन पुर्वरत करण्यासाठी पालिका प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. यामध्ये पहिल्या टप्प्यात २२ लाख मेट्रीक टनपैकी साडे आठ लाख मेट्रीक टन इतक्या कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावून ही जमीन कचरामुक्त करून पुर्वीप्रमाणे केली जाणार आहे. राज्य शासनाने ठाणे महापालिकेला कचरा भुमीसाठी भिवंडी येथील आतकोली भागात जागा देऊ केली असून येथे शास्त्रोक्त पद्धतीने कचरा विल्हेवाट प्रकल्प उभारणीसाठी पालिका प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. त्याचबरोबर डायघर येथेही कचऱ्यापासून वीज निर्मीती करण्याचा प्रकल्प उभारण्यात येत आहे. हा प्रकल्प पुर्णपणे कार्यान्वित झालेला नसला तरी याठिकाणी कचरा वर्गीकरण करण्याचे काम सुरू झाले आहे. या दोन्ही ठिकाणी कचराभुमी होण्यापुर्वी पालिका प्रशासनाकडे हक्काची कचराभुमी नव्हती. यामुळे गेल्या कित्येक वर्षापासून ठाणे महापालिका क्षेत्रात दररोज निर्माण होणारा ९५० मेट्रिक टन कचरा दिवा भागात टाकला जात होता. येथे कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक क्षमतेचे प्रकल्प उभारले नाहीत म्हणून हरीत लवाद आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पालिकेला वांरवार नोटीसा येत होत्या.



या कचराभूमीमुळे परिसरात दुर्गंधी पसरण्याबरोबरचा सातत्याने आगी लागण्याच्या घटना घडतात. त्यामुळे ही कचराभूमी बंद करण्यासाठी स्थानिक नागरिकांकडून आंदोलने केली होती. परंतु डायघर प्रकल्प कार्यान्वित होण्यास उशीर होत होता. त्यामुळे डायघर प्रकल्प सुरू होईपर्यंत शहराबाहेर म्हणजेच भांडर्ली भागात पालिकेने जागा भाड्याने घेऊन तिथे कचरा टाकण्यास सुरू केले होते. या कचराभुमीमुळे शेतीचे नुकसान होऊ लागले. यामुळे स्थानिकांनी कचराभुमीस विरोध सुरू केला. अखेर पालिकेने डायघर प्रकल्पाचे काम पहिल्यात सुरू करत भांडर्ली कचराभुमी बंद केली. असे असले तरी दिवा आणि भांडर्ली कचराभुमीवर कचऱ्याचे ढिग साचलेले आहेत. हे ढिग हटवून तेथील जमीन पुर्वरत करण्यासाठी पालिका प्रशासनाने आता पाऊले उचलली आहेत.

# अडीच वर्षात सहा हजार वीज चोऱ्या ५० कोटींची वीज चोरी

■ पालघर : सचिन कदम

वसई विरार शहरात छुप्या मार्गाने वीज चोरी करण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. मागील अडीच वर्षात ६ हजार ३१९ वीज चोरट्यांनी ५० कोटी ३९ लाखाची वीज चोरी झाल्याचे उघड झाले आहे. या वाढत्या वीज चोरीचा फटका वीज ग्राहक यांच्यासह महावितरणला बसत आहे.महावितरणच्या वसई मंडळातून वसई विरार यासह वाडा या विभागात सुमारे दहा



लाखाहून अधिक वीज ग्राहकांना वीजपुरवठा केला जातो.

मागील काही वर्षापासून शहराचे नागरीकरण वाढत आहे तर दुसरीकडे औद्योगिक क्षेत्र ही विस्तारत आहे. त्यामुळे वीज ग्राहकांची संख्या वाढत आहे. मात्र काही ठिकाणी अद्यापही छुप्या मार्गाने वीज चोरी करण्याचे प्रकार सुरूच आहेत. वीज मीटरच्या वाहिन्यांमध्ये फेरफार करणे, आकडे टाकणे, मुख्य वीज जोडणीच्या सर्व्हिस वाहिनीला टॅपिंग करणे अशा विविध प्रकारच्या, रिमोट कंट्रोल अशा विविध क्लुप्त्या लढवून वीज चोरी होते. विशेषतः शहरात वाढणाऱ्या अनधिकृत चाळी अशा भागातही वीज चोरी होण्याचे प्रमाण अधिक आहे.याचा फटका सर्वसामान्य नागरिकांसह महावितरणला बसून लागला आहे. या वीज चोरीमुळे महावितरणचा आर्थिक तोटा होऊ लागला आहे.वीज चोरी रोखण्यासाठी महावितरणकडून भरारी पथके, विशेष मोहिमा हाती घेऊन कारवाया केल्या जात आहेत.मागील अडीच वर्षात एप्रिल २०२२ ते ऑगस्ट २०२४ या दरम्यान ६ हजार ३१९ ठिकाणी वीज चोरांच्या विरोधात कारवाई करण्यात आली आहे. या वीज चोरट्यांनी महावितरणची ५० कोटी ३९ लाख रुपयांची वीज चोरी केली होती. यातील सर्वाधिक वीज चोर हे नालासोपारा पूर्वेच्या भागातील १४७७ व वसई पूर्वेच्या भागातील १२९१ या भागातील आहेत.त्यांच्यावर वीज कायदा कलम १३५ नुसार कारवाई केली असल्याचे महावितरणने सांगितले आहे. वीज चोरीमुळे वीज तोटा अधिक प्रमाणात सहन करावा लागत आहे. वीज गळती होण्याच्या प्रकारात वीज चोरीचे प्रमाण अधिक आहे.

# आपत्कालीन स्थितीत १४ गावांत महापालिकेचीच धाव!

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात १४ गावांच्या सहभागावरून व विकासकामांसाठी आगामी काळात लागणाऱ्या खर्चावरून विविध राजकीय पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत असल्याचे चित्र असले तरी १४ गावांमध्ये आपत्कालीन स्थिती निर्माण झाल्यास नवी मुंबई महापालिकेलाच धाव घ्यावी लागणार असल्याची माहिती पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी 'लोकसत्ता'ला दिली आहे. चौदा गावांना सहभागी करण्याच्या निर्णयावर 'तू-तू मैं-मैं'रंगले असले तरी आपत्कालीन स्थितीत महापालिकेला झटकता येणार नाही. वगळलेली १४ गावे पुन्हा नवी मुंबई महापालिकेत समाविष्ट करण्यात आल्याचा निर्णय २२ मार्च २०२४ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केला होता. या गावांना पुन्हा नवी मुंबईत सामावून घेतले



असल्याने आमदार गणेश नाईक व शिवसेना शिंदे गट, उद्धव गट यांच्याकडून वादंग रंगल्याचे समोर आले आहे.

ग्रामविकास विभागाच्या मार्फतच हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती १४ गावांच्याबाबत जबाबदारी असलेले परिमंडळ उपायुक्त भागवत डोईफोडे यांनी 'लोकसत्ता'ला दिली आहे. पालिकेने या गावांच्या कामकाजासाठी तिसरे परिमंडळ निर्माण केले आहे तसेच एका उपायुक्तांची निवड केली आहे. ही गावे सामावून घेताना खर्चाचा मोठा भुर्दंड पालिकेला पडणार असल्याने पालिकेच्या उत्पन्नातून कोणताही खर्च करू नये असा पवित्रा आमदार नाईक यांनी घेतला आहे. तसेच शासनाने महापालिकेला मोठा आर्थिक निधी उपलब्ध करण्याची मागणीही केली आहे. त्यामुळे १४ गावांबाबत नवी मुंबई महापालिकेला मोठी आर्थिक जबाबदारी पेलावी लागणार आहे. असे असले तरी या १४ गावांमध्ये कोणतीही आपत्कालीन स्थिती निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी व नियंत्रणाची मोठी जबाबदारी पालिकेलाच पार पाडावी लागणार आहे. या गावांच्या स्वच्छतेबाबत पालिका अधिकाऱ्यांनी १४ गावांची पाहणी करून अगोदरच सुरू असलेल्या ५ कचरा वाहतूक गाड्या व २० साफसफाई कामगारांद्वारेच स्वच्छतेचे काम पार पाडले जात आहे. पालिकेच्या अधिकाऱ्यांनी फक्त भेट घेत स्वच्छतेबाबत सूचना देण्याचे काम केले आहे.

महापालिकेला १४ गावांसाठीचे नियोजन प्राधिकरण अधिकार प्राप्त झाले आहेत. १४ गावांच्या समावेशाबाबत राजकीय पक्षांनी आपल्या भूमिका आमच्यापर्यंत पोहोचवल्या आहेत.

# कल्याणमध्ये तरूणीची छेड काढल्याने, दोन गटात हाणामारी

■ कल्याण : आकाश कांबळे

कल्याण पूर्वेतील पत्रीपूल भागातील नवी गोविंदवाडी भागात शुक्रवारी दोन तरूणांनी याच भागातील एका तरूणीची छेड काढली. तरुणीच्या कुटुंबीयांनी तरूणांच्या घरी जाऊन याप्रकरणी जाब विचारला. यावरून रस्त्यावरच तरूणीचे नातेवाईक आणि आरोपी तरूणांचे कुटुंब यांच्यात जोरदार हाणामारी झाली.

या हाणामारीवरून नवी गोविंदवाडी भागात वातावरण तणावपूर्ण वातावरण निर्माण झाल्याने टिळकनगर पोलिसांनी या भागात बंदोबस्त तैनात केला. याप्रकरणी टिळकनगर पोलिसांनी दोन्ही गटाविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत. दोन्ही गटातील एकूण पाच जणांना अटक केली आहे. जाकीर शेख, अरहम सय्यद अशी छेड काढणाऱ्या तरूणांची नावे आहेत. ते नवी गोविंदवाडी भागात राहतात.



पोलिसांनी सांगितले, गेल्या काही दिवसांपासून आरोपी पीडित तरूणीचा घराबाहेर आली की पाठलाग करायचे. तिचा मोबाईल क्रमांक देण्याची मागणी करत होते.

# मालमत्ता थकबाकीदारांना पालिकेचा दणका; पालिकेकडून मालमत्ता जप्तीच्या नोटिसा बजावण्यास सुरवात

■ वसई: सतिश सोनावणे

मालमत्ता कराची रक्कम वर्षानुवर्षे थकीत ठेवणाऱ्या मालमत्ता धारकांवर पालिकेने जप्तीची कारवाई सुरू केली आहे. सुमारे ८ हजार ५७१ इतक्या मालमत्ता धारकांना जप्तीच्या नोटिसा पाठविल्या आहेत. दिलेल्या मुदतीत कर भरणा न झाल्यास त्या मालमत्ता जप्त करून लिलाव केला जाणार आहे.

वसई विरार भागात ९ लाखाहून अधिक छोट्या मोठ्या औद्योगिक वसाहती, उपहारगृहे, इमारती, सदनिका अशा विविध मालमत्ता आहेत. या मालमत्ताकरातून पालिकेला उत्पन्न मिळते. मालमत्ता कर हा पालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. मात्र काही मालमत्ता धारकांनी वर्षानुवर्षे पालिकेचा मालमत्ता कर भरणा न केल्याने पालिकेला मोठा आर्थिक फटका बसू लागला आहे.

यावर्षी पालिकेने एप्रिल महिन्याच्या सुरवातीपासूनच कर संकलन करण्यावर भर दिला आहे. विशेषतः ज्या मालमत्ता धारकांनी मागील तीन ते चार वर्षापासून कर थकीत ठेवला आहे त्या मालमत्ता धारकांवर लक्ष केंद्रित केले आहे.थकबाकी दारांच्या मालमत्ता जप्त करून त्याचा लिलाव करण्याचे आदेश महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी कर संकलन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानुसार आता कारवाई



करण्यास सुरवात झाली आहे. आतापर्यंत महापालिकेने ८ हजार ५७१ इतक्या मालमत्तांना जप्तीच्या नोटिसा बजावल्या असून त्यांची थकीत रक्कम ही २४ कोटी ७ लाख इतकी आहे. ज्या थकबाकीदारांनी वर्षानुवर्षे मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही त्यांना जप्तीपूर्व नोटीसा देण्यात आल्या असून नोटीसा वाटपाचे काम सुरु आहे. यानंतरही कर भरणा न केल्यास अशा थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करून लिलाव केला जाईल असा इशारा पालिकेने दिला आहे. यंदाच्या वर्षी मालमत्ता कर संकलन चांगल्या प्रकारे व्हावे यासाठी एप्रिलपासूनच कराची देयके मालमत्ता धारकांना बजावण्यास सुरुवात केली आहे. तर दुसरीकडे विशिष्ट कालावधीमध्ये कर भरणा केल्यास मालमत्ता धारकांना विशेष सवलती सुद्धा पालिकेने जाहीर केल्या होत्या.याशिवाय संकेतस्थळावर ऑनलाइन स्वरूपात कर भरणा करण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. यंदाच्या २०२४-२५ या आर्थिक वर्षात आतापर्यंत पालिकेने १५१ कोटी ४३ लाख रुपये इतका मालमत्ता कर वसूल केला आहे.

# वसई-विरारमधील पशुवैद्याकीय रुग्णालयाला विलंब

■ वसई : सुचिता देशमुख

मागील चार वर्षापासून वसईत जखमी व आजारी पशु प्राण्यांवर उपचार करण्यासाठी नवीन पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय तयार करण्यात येत आहे. मात्र विद्युत व फर्निचर यासह अन्य कामे पूर्ण करण्याच्या कामात दिरंगाई होत आहे. त्यामुळे प्राणीमित्रांनी नाराजी व्यक्त केली आहे. वसई विरार शहरात एकही शासकीय पशु वैद्यकीय रुग्णालय नसल्याने जखमी पशूंना उपचारासाठी दुसऱ्या ठिकाणी घेऊन जावे लागते. शहरात मोठ्या प्रमाणात विविध प्रकारचे पशु प्राणी आहेत. काही वेळा पशु आजारी पडतात. तर काही वेळा रस्त्यावर वाहनांच्या धडका लागून व अन्य कारणामुळे जखमी होतात. अशा वेळी जवळच्या भागात रुग्णालय नसल्याने नागरिकांना पशूंना घेऊन नवी मुंबई यासह इतर ठिकाणी उपचारासाठी न्यावे लागते. तेव्हा त्यांची चांगलीच फरफट



होत असते.

वसईत पशुवैद्यकीय शासकीय रुग्णालय उभारण्यात यावे अशी मागणी प्राणी प्रेमींनी सातत्याने केली आहे. त्यानुसार वसई पश्चिमेच्या सांडोर येथे पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या रुग्णालय उभारणीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ऑक्टोबर २०२१ पासून सुरू केले आहे. उभारण्यात येत असलेले रुग्णालय हे ६ हजार ८०० चौरस फुटांचे असून यासाठी सुमारे ३.५० कोटी रुपये इतका निधी खर्च केला आहे. मात्र चार वर्षे होत आली तरीही काम पूर्ण होऊन रुग्णालय सुरू झाले नसल्याचे चित्र दिसून येत आहे. सद्यस्थितीत पशुवैद्यकीय रुग्णालयाची इमारत उभी झाली आहे. मात्र इमारतीच्या अंतर्गत विद्युत ,फर्निचर व अन्य कामे अगदी धीम्या गतीने सुरू असल्याने रूग्णालय सुरू होणार तरी कधी असा प्रश्न प्राणी प्रेमींनी उपस्थित केला आहे. जर तयार झालेला इमारतीचा वापरच होणार नाही तर त्याची दुरवस्था होण्याची शक्यता आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काम पूर्ण झाले आहे असे सांगितले जाते. मात्र किरकोळ कामातही वर्षभराचा अवधी घालविला असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे. आता अंतर्गत जे काही काम बाकी आहे ते जलदगतीने पूर्ण करून ते रुग्णालय सुरू करावे अशी मागणी प्राणी प्रेमींनी केली आहे. जून २०२३ मध्ये रुग्णालयाचे ९० टक्के पूर्ण झाले असल्याचे बांधकाम विभागाने सांगितले होते. मात्र तेव्हा पासून विविध कारणे पुढे करीत ते काम अगदी कासवगतीने पुढे सरकत आहे. या कामात नियोजना अभाव असल्यानेच काम पूर्ण होत नाही असा आरोप नागरिकांनी केला आहे. वसईत उभारण्यात येणारे पशुवैद्यकीय रुग्णालय हे सुसज्ज असे रुग्णालय आहे. एक्सरे , सोनोग्राफी, शस्त्रक्रिया, जखमीवर उपचार , लॅबची सुविधा व आधुनिक यंत्रणा आदी याठिकाणी बसवून पशु प्राण्यांवर उपचार केले जाणार आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
मध्य मुंबई (विद्युत) विभाग, सा. बां. विभाग,
सावली इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई – ४०००१८.
ई-मेल : elcentralmumbai.ee@mahapwd.gov.in, elcentralmumbai.ee@gmail.com, दूरध्वनी क्र.०२२-२४९२४३४९

दरपत्रके मागविण्याबाबतची सूचना क्र. 11 सन 2024-25

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग वरळी मुंबई १८ हे खालील कामांसाठी/ विविध साहित्यांसाठी अंदाजपत्रके /दर अनुसूची तयार करण्यासाठी साहित्य विक्रेते /डिलर्स/उद्योजक तसेच अनुभवी अभिकरणाकडून स्पर्धात्मक दर मागवित आहे.

सदर दरपत्रके http://www.mahatender.gov.in या संकेत स्थळावर दि. १३.०९.२०२४ ते दि. २०.०९.२०२४ रोजी १७.३० वाजेपर्यंत Online पद्धतीने सादर करावे. किंव्हा कार्यालीन वेळेत कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विभाग, वरळी, मुंबई येथे दरपत्रके सादर करावे. सदर दरपत्रके शक्यतो दि. २३.०९.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. सदर बाबींचे तांत्रिक तपशील वरील संकेत स्थळावर व या कार्यालयात उपलब्ध राहतील. अटी व शर्ती असलेले दरपत्रके स्वीकारली जाणार नाही.

Est. No.D21142/2024-25Providing Complete professional video & audio recording and editing Studio setup with Accoustic Insulation with Switchgear Panel at P L Deshpande Kala Akadami at Prabhadevi,Dadar

Note : - Please visit to www.mahatender.gov.in notice inviting tender page for detail item description.

अटी :-
१ दरपत्रके सीलबंद पाकीटात व कंपनीच्या नाममुद्रीत पत्रावर सादर करावीत. वर नमुद केलेल्या दिनांक व वेळेनंतर दरपत्रके स्वीकारण्यात येणार नाहीत.
२ नमुद केलेले दर हे ९० दिवस ग्राह्य राहतील.
३ कोणतेही दरपत्रक कोणतेही कारण न देता नामंजुर करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवलेला आहे.
४ वरील दर भरताना जी.एस.टी. दर वगळुण नमुद करावा. अंदाजीत रक्कमेवर नमुद केलेल्या दरानुसार आलेल्या रक्कमेवर १८% नुसार जी.एस.टी. देय राहील.

जा.क्र.काअ/ममुविवि/२९६६/२०२४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
मध्य मुंबई (विद्युत) विभाग,
सा. बां. विभाग,
सावली इमारत, गणपत जाधव मार्ग,
वरळी, मुंबई – ४०००१८.
दि. 05/09/2024

Sd/-
(नलिनी सु. सुवाचे)
कार्यकारी अभियंता
मध्य मुंबई विद्युत विभाग

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/२९३७

# 'मी तुम्हाला शब्द देतो, एकदा राज्य हातामध्ये द्या, मग...', शरद पवारांचा महायुतीवर हल्लाबोल

■ मुंबई : सम्यक कासारे

विधानसभेची निवडणूक जवळ आल्यामुळे सध्या सर्वच राजकीय पक्षांच्या राज्यभरात विविध ठिकाणी सभा, मेळावे सुरु आहेत. या सभा आणि मेळाव्याच्या माध्यमातून निवडणुकीचे रणशिंग फुंकले जात आहेत. त्यामुळे सध्या राज्यात वातावरण तापलं आहे. या दौऱ्यांच्या माध्यमातून विधानसभेच्या अनुषंगाने मतदारसंघाचा आढावा घेतला जात आहे. उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. तसेच सत्ताधारी आणि विरोधी पक्ष एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपही करताना पाहायला मिळत आहेत. याच अनुषंगाने आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचा धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा येथे शेतकरी मेळावा पार पडला. या मेळाव्यात बोलताना शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह राज्यातील महायुतीच्या नेत्यांवर हल्लाबोल केला. तसेच 'मी तुम्हाला शब्द देतो, एकदा राज्य हातामध्ये द्या, मग महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलल्याशिवाय राहणार नाही', असंही शरद पवारांनी म्हटलं.

'देशातील शेती खात्याचा कारभार १० वर्ष मी सांभाळला. ज्यावेळी माझ्याकडे शेतीखात्याचं काम आलं तेव्हा पहिलं काम माझ्याकडे आलं की अमेरिकेतून गहू आयात करायचे. परदेशातून तांदूळ आणायचे. मला त्यावेळी दुःख झालं. शेतकरी कुंटुबात माझा जन्म झाला. आई-वडील शेती करतात. हा देश बळीराजाचा देश आहे आणि असं असतानाही गहू आणि तांदुळा सारखं धान्य परदेशातून आणायचं. ही गोष्ट



आपल्याला पटणारी नव्हती. त्यामुळे मी तेव्हा हे आव्हान स्वीकारलं. गव्हाची आणि तांदळाची किंमत वाढवली. मी १० वर्ष या खात्याचं काम पाहिलं आणि २०१४ मध्ये मी त्या खात्याचं काम सोडलं. त्यावेळी मला सांगायला अभिमान वाटतो की, भारत देश १० वर्षात जगातील गहू निर्यात करणारा दोन नंबरचा देश बनला. कृषीमंत्री असताना देशातील सर्व शेतकऱ्यांचं ७१ हजार कोटी रुपयांचं कर्ज माफ केलं', असंही शरद पवार म्हणाले.

'आज हाच तालुका कष्टकरी आणि शेतकऱ्यांचा तालुका आहे. मात्र, या ठिकाणी काय दिसतं आहे? सत्तेचा गैरवापर सुरु झाला. गुंडगिरी सुरु झाली. खोटे गुन्हे दाखल करण्यात येऊ लागले आहेत. दमदाटी करण्याचे प्रकार वाढले. लोकांना तुरुंगात टाकण्याचे प्रकार होऊ लागले. मात्र, सत्ता ही लोकांच्या कामांसाठी असते. पण काही लोकांकडे सत्ता हातात आल्यानंतर सत्ता डोक्यात शिरते आणि सत्तेचा गैरवापर होतो. सध्या राज्याची सत्ता चुकीच्या लोकांच्या हातामध्ये सत्ता आहे. ती सत्ता उद्या संधी मिळाल्यानंतर त्यांच्या हातातून काढून घेणं महाविकास आघाडीच्या हातात देणं हे काम तुम्हाला करायचं आहे. मी तुम्हाला शब्द देतो की तुम्ही राज्य हातामध्ये द्या महाराष्ट्राचा चेहरा हा बदलल्याशिवाय राहणार नाही. मी तुम्हाला शब्द देतो, एकदा राज्य हातामध्ये द्या, मग महाराष्ट्राचा चेहरा हा बदलल्याशिवाय राहणार नाही', असंही शरद पवार म्हणाले.

## 'नितीन गडकरींना पंतप्रधानपदासाठी तडजोड..', संजय राऊत यांचं वक्तव्य

■ मुंबई : विशाल कारंडे

ठाण्यातल्या तलावपाळी या ठिकाणी अनेक साहित्यिक कार्यक्रम झाले आहेत. ठाण्याने शिवसेनेला पहिली सत्ता महाराष्ट्रात मिळाली. ठाण्याने सुसंस्कृत नेते निर्माण केले. या ठाण्याने अनेक नेतेही निर्माण केले. मो. दा. जोशी, आनंद दिघे अशी अनेक नावं घेता येतील. ज्या आनंद दिघेंना मुख्यमंत्री गुरु मानतात त्यांच्या वास्तूत गुंडांनी आणि टार्गट पोरांनी लेडीज बार असल्याप्रमाणे पैसे उधळले.



अशी टीका संजय राऊत ( ऐंर्हेंबॅंटू ) यांनी केली. जो हा उपक्रम साजरा केला ते चित्र विचलित करणारं आहे. मी कालही म्हटलं की जिथे आनंद दिघे बसत होते तिथे हंटर लावलेला असायचा. त्याचा अर्थ असा होता की चुकाल तर हंटर बसेल. जर आज आनंद दिघे असते तर लेडीज बारवाल्या मिंधे सेनेला आणि त्यांच्या बॉसला चाबकाने फोडून काढलं असतं असं म्हणत संजय राऊत यांनी आनंद आश्रमात जे घडलं त्यावर जोरदार टीका केली.

आनंद आश्रमाचा बेकायदेशीर ताबा मिंधेंनी घेतला आहे. पारशांचा तो ट्रस्ट होता, तसंच ती आनंद दिघेंची मालमत्ता आहे. आनंद दिघे हे काही तुमचे काही खासगी नाहीत. तुमची संस्कृती काय आहे ते दिसलं. मिंधे सेनेचे सरदार यांचीही ही संस्कृती आहे जी खालपर्यंत झिरपली आहे. बाकी पदावरुन काढलं वगैरे ही सगळी नौटंकी आहे. अशीही टीका संजय राऊत यांनी केली

नितीन गडकरी हे भाजपातले एक सर्वमान्य असे नेते आहेत. पंतप्रधानपदासाठी तडजोड करा असं त्यांना कुणी सांगितलं असेल असं मला वाटत नाही. या देशात हुकूमशाही, एकाधिकारशाही सुरु आहे, आणीबाणी लावण्याचा प्रयत्न सुरु आहे त्याच्याशी तडजोड करु नका अशी भूमिका विरोधी पक्षातल्या नेत्याने त्यांच्याकडे मांडली असेल तर त्यात काही चुकीचं आहे असं वाटत नाही. आज सरकारमध्ये बसून देशातल्या मूल्यांशी तडजोड केली जाते तो राष्ट्रीय अपराध आहे असं मी मानतो. नितीन गडकरी सातत्याने या विरोधात बोलतात, त्यामुळे विरोधी पक्षातल्या प्रमुख नेत्याने सल्ला दिला असेल तर त्यात पिडा कुणाला होण्याचं कारण नाही. देशात स्वातंत्र्य आणि लोकशाही टिकवायची असेल तर काहींना त्याग करावा लागतो. असंही संजय राऊत म्हणाले. 'मला चांगलं लक्षात आहे, मी कुणाचंही नाव घेणार नाही. मात्र त्या व्यक्तीने मला सांगितलं होतं, तुम्ही पंतप्रधान होणार असाल तर आम्ही पाठिंबा देऊ.

## मुंबई–पुणे प्रवास अधिक वेगवान

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) हाती घेतलेल्या ठाणे खाडी पूल-३ प्रकल्पातील दक्षिणेकडील अर्थात मुंबईहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेचे काम पूर्ण झाले आहे. आता विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जारी होण्यापूर्वी ही मार्गिका वाहतूक सेवेत दाखल करण्याचा निर्णय एमएसआरडीसीने घेतला आहे.

सप्टेंबरअखेरीस वा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात ही मार्गिका वाहतुकीसाठी खुली होणार आहे. ही मार्गिका वाहतुकीस खुली झाल्यास मुंबईहून पुण्याकडे जाण्यासाठी खाडीपूल-२ सह नवीन ठाणे खाडी पूल-३ चा पर्याय उपलब्ध होणार आहे. त्यामुळे मुंबई – पुणे प्रवास वाहतूक कोंडीमुक्त, वेगवान होणार आहे. मुंबई – पुणे प्रवासासाठी सध्या दोन खाडीपूल सेवेत आहेत. या पार्श्वभूमीवर एमएसआरडीसीने ठाणे खाडी पूल-३ प्रकल्प



हाती घेतला आहे. हा प्रकल्प आतापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र तांत्रिक अडचणींमुळे प्रकल्प लांबणीवर पडला आहे. आता मात्र या प्रकल्पाने वेग घेतला आहे. या प्रकल्पातील दक्षिणेकडील मार्गिकेचे अर्थात मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या मार्गिकेचे काम पूर्ण झाल्याची माहिती एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी 'लोकसत्ता'ला दिली. येत्या १५ दिवसांत ही मार्गिका वाहतूक सेवेत दाखल होईल, असेही त्यांनी सांगितले. या मार्गिकेच्या लोकार्पणासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वेळ घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

दक्षिणेकडील बाजू वाहतुकीस खुली झाल्यास मुंबईहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या वाहनचालक, प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. ठाणे खाडी पूल-२ सह आणखी एक वाहतुकीचा पर्याय ठाणे खाडी पूल-३ च्या रूपाने उपलब्ध होणार आहे. त्यामुळे खाडी पूल-२ वरील वाहतूक कोंडी दूर होणार आहे, तर मुंबई – पुणे प्रवास वेगवान होणार आहे. मात्र त्याच वेळी पुणे – मुंबई वाहतूक कोंडीमुक्त आणि वेगवान प्रवासासाठी प्रवासी, वाहनचालकांना आणखी चार महिने वाट पाहावी लागणार आहे. उत्तरेकडील मार्गिकेचे अर्थात पुणे – मुंबई मार्गिकेचे ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे.

## एसईबीसी व नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांना १५ दिवसांची मुदतवाढ

■ मुंबई : यश सावंत

विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातून (एसईबीसी) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना एसईबीसी व नॉन क्रमीलेअर प्रमाणपत्र मिळण्यात अडचणी येत आहेत. वेळेत प्रमाणपत्र सादर करणे शक्य न झाल्याने विद्यार्थ्यांचे प्रवेश खुल्या प्रवर्गामध्ये वर्ग झाले. अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द झाले आहेत. ही बाब लक्षात घेऊन एसईबीसी प्रवर्गांतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उच्च व तंत्र शिक्षण विभागाला दिले आहेत. त्यामुळे विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना एसईबीसीअंतर्गत प्रवेश घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

अभियांत्रिकीसह विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना मराठा प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी एसईबीसीअंतर्गत प्रवेश घेतले आहेत. विद्यार्थ्यांना एसईबीसी व नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेल्या पावतीच्या आधारे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून प्रवेश देण्यात आले. पहिल्या व दुसऱ्या फेरीमध्ये पावतीच्या आधारे प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना तिसऱ्या फेरीपर्यंत एसईबीसी व नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. या प्रमाणपत्रासाठी अर्ज करूनही विद्यार्थ्यांना महसूल विभागाकडून ते मिळण्यास विलंब होत आहे.

## नायर रुग्णालयात विद्यार्थिनीचा लैंगिक छळ, सहाय्यक प्राध्यापक निलंबित

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

कोलकाता बलात्कार आणि हत्या प्रकरण ताजं असताना आता मुंबईतही विद्यार्थीनीचा लैंगिक छळ केल्याच्या आरोपावरून सहाय्यक प्राध्यापकाचं निलंबन करण्यात आलं आहे. मुंबई महानगर पालिकेच्या अख्यारित असलेल्या बीआयएल नायर रुग्णालयात हा प्रकार घडला आहे.

फ्री प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. फ्री प्रेसने दिलेल्या वृत्तानुसार महानगरपालिकेने सांगितलं की, संपूर्ण तपास पूर्ण झाल्यानंतर आणि चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आरोपी-निलंबित सहाय्यक प्राध्यापकाविरुद्ध



पुढील कारवाई केली जाईल. सहा महिन्यांपूर्वी मार्चमध्ये या प्रशिक्षणार्थी डॉक्टरला एका सहाय्यक प्राध्यापकाने बोलावले आणि तिच्या खेळाविषयी विचारणा केली. ही संबंधित पीडिता खेळाडूही आहे. फ्री प्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, काही दिवसांनंतर सहाय्यक प्राध्यापकाने तिला पुन्हा आपल्या केबिनमध्ये बोलावले. केबिनमध्ये त्यांनी तिच्या मानेला आणि कानाला अयोग्यरित्या स्पर्श केला. तिच्या नाकातील लिफ्म नोड्सची सूज तपासात असल्याचा बहाणा करत त्यांनी तिला स्पर्श केल्याचा दावा पीडितेने केला. तिला तिचे प्रश्न काढायला सांगून तिच्या खांद्यावरही हात ठेवला. तसंच तिच्या ओठाच्या रंगांवरूनही तिला बोलले.

## महाराष्ट्र काँग्रेसमधील वाद आता दिल्ली दरबारी; पटोले, धानोरकर, वडेट्टीवारांना पक्षश्रेष्ठींकडून पाचारण

■ नागपूर: राकेश गायकवाड

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्र काँग्रेसमधील वाद वाढत असल्याने पक्षश्रेष्ठीने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांना शनिवारी दिल्लीत बोलावून घेतले. काँग्रेसच्या चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी काही दिवसांआधी वडेट्टीवार यांच्या मतदारसंघात कुणबी समाजाच्या कार्यक्रमात वडेट्टीवारांचे प्रत्यक्ष नाव न घेता यांच्याविरुद्ध वक्तव्य केले होते. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात काही अल्पसंख्य आपल्यावर राज्य करीत आहेत. आता परिवर्तनाची वेळ आली



आहे, असे त्या म्हणाल्या होत्या. वडेट्टीवार यांनी याबाबत पक्षश्रेष्ठीकडे तक्रार केली होती. त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी पटोलेंसह धानोरकर आणि वडेट्टीवार यांना दिल्लीला शनिवारी पाचारण केले.

वडेट्टीवार व धानोरकर यांच्यात चंद्रपूर जिल्ह्यात राजकीय वर्चस्वाची लढाई सुरू आहे. खासदार बंडू धानोरकर यांच्या अकाली निधानानंतर प्रतिभा धानोरकर यांनी चंद्रपूर लोकसभेवर दावा केला होता तर त्याचवेळी वडेट्टीवार यांनी त्यांची मुलगी शिवानीसाठी जोर लावला. तेव्हापासून या दोन नेत्यांमध्ये मतभेद वाढत गेले आणि धानोरकर यांनी केलेल्या वक्तव्याने ते अधिक गंभीर झाले. त्यामुळे पक्षक्षेष्ठींनी त्यांना बोलावून घेतल्याचे समजते.

## सोलापूर जिल्ह्यात शिवसेना ठाकरे गटाची कोंडी; जागा वाटपात मतदारसंघ, उमेदवारांचीही वाणवा

■ सोलापूर: राकेश गायकवाड

आगामी विधानसभा निवडणुकांचे पडघम वाजत असताना सोलापूर जिल्ह्यात पूर्वी आठ जागा लढवणाऱ्या आणि कधी काळी चार आमदार असणाऱ्या शिवसेना ठाकरे गटाची यंदा मोठी कोंडी होण्याची शक्यता आहे. युतीमध्ये असताना जे मतदारसंघ सहजपणे वाट्याला येत होते तिथे आता आघाडीतील अन्य मित्र पक्ष दावेदार असल्याने ठाकरे गटाची अडचण झाली आहे. तर जे मतदारसंघ मिळण्याची शक्यता आहे, तेथील उमेदवार शरद पवार गटाकडून उमेदवारीसाठी इच्छुक आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीत या पक्षाला महाविकास आघाडीकडून एखाददुसरी तरी जागा सुटणार की, नाही याबाबत राजकीय वर्तुळात प्रश्नार्थक चर्चा ऐकायला मिळते.

१९८१-८२ नंतर राज्यात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे जाळे निर्माण झाले असताना इकडे सोलापूर जिल्ह्यातही कडव्या आणि निष्ठावंत शिवसैनिकांनी पक्षाचे जाळे विणले होते. प्रस्थापितांच्या विरोधात आवाज उठवताना काही शिवसैनिकांना प्राणास मुकावे लागले होते. १९९५ साली तत्कालीन शिवसेना-भाजप युतीच्या प्रभावामुळे त्यावेळच्या उत्तर सोलापूर राखीव जागेवर शिवसेनेचा पहिला आमदार उत्तमप्रकाश खंदारे यांच्या माध्यमातून निवडून आला. पुढे ते मंत्री झाले आणि नंतर त्यांनी सलग तीनवेळा आमदारकी सांभाळली होती. २००४ साली तर खंदारे यांच्यासह राजेंद्र राऊत (बार्शी), जयवंतराव जगताप (करमाळा) आणि




रतिकांत पाटील (दक्षिण सोलापूर पोटनिवडणूक) असे चार आमदार निवडून आले होते. पक्षाच्या दृष्टीने जिल्ह्यातील ती सर्वोच्च कामगिरी होती. परंतु नंतर त्यापैकी आमदार राजेंद्र राऊत आणि आमदार जयवंतराव जगताप हे शिवसेनेतून बाहेर पडले. इकडे उत्तर सोलापूर राखीव मतदारसंघातून उत्तम प्रकाश खंदारे हे २००९ पर्यंत विधानसभेवर प्रतिनिधित्व करीत होते.तथापि, पुढे जिल्ह्यात पक्षाच्या बांधणीकडे दुर्लक्ष होऊन गटबाजी वाढली. त्यानंतर कधीही सुधारणांच्या दृष्टीने सकारात्मक चित्र दिसले नाही. पूर्वी शिवसेना-भाजप युती असताना जिल्ह्यात १३ विधानसभेच्या जागांपैकी सांगोला, करमाळा, माढा, बार्शी, दक्षिण सोलापूर, सोलापूर शहर दक्षिण, मंगळवेढा आणि मोहोळ अशा आठ जागा शिवसेनेच्या वाट्याला आल्या होत्या. तर भाजपकडे अक्कलकोट, सोलापूर शहर उत्तर, पंढरपूर, माळशिरस अशा मोजक्याच चार जागा होत्या. परंतु शिवसेनेला जम बसविता आला नाही. मागील २०१९ साली पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे ॲड. शहाजीबापू पाटील हे सांगोल्यातून शेकापचे दिवंगत ज्येष्ठ नेते गणपतराव देशमुख यांचे नातू डॉ. अनिकेत देशमुख यांचा थोडक्या मतांनी पराभव करून आमदार झाले खरे. नंतर ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटात सामील झाले. बार्शीत पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी मंत्री दिलीप सोपल हे मागील २०१९ साली शिवसेनेच्या चिन्हावर विधानसभा लढले आणि पराभूत झाले. गेल्या पाच वर्षांत सोपल शिवसेना ठाकरे गटात असूनही पूर्णतः अलिप्त आहेत. आगामी विधानसभेसाठी त्यांच्याकडून राष्ट्रवादी शरद पवार गटाची तुतारी हातात घेतली जाण्याची चर्चा ऐकायला मिळते.

## गणेशोत्सवात झेंडू दराने गाठली शंभरी; पावसामुळे झेंडूच्या उत्पादनात घट

■ सातारा: नितीन देवळेकर

गणेशोत्सवापूर्वी चाळिस रुपये किलो असा दर असलेल्या झेंडूने गणेशोत्सवात मात्र घाऊक बाजारात शंभरी गाठली आहे. उत्सवात दर फुलल्यामुळे झेंडू उत्पादकांना गणराय पावला आहे. वाढीव दरामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे. 'गोल्डन यलो' आणि 'गोल्डन ऑरेंज' जातीची झेंडूची फुले ही किरकोळ बाजारात गणेशोत्सवात ३०० रुपये किलो दराने विकली गेली.गणेशोत्सवापूर्वी बाजारात झेंडूच्या फुलाचे दर पडल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील चिंता दिसून येत होती. यंदा सतत पाऊस असल्याने झेंडूची लागवड कमी झाली आहे. शिवाय ज्यांनी लागवड केली त्यांचा उगवलेला झेंडूदेखील सततच्या पावसामुळे खराब झाला आहे. दुसरीकडे ढगाळ वातावरणामुळे यंदा झेंडूवर रोगाचा प्रादुर्भावदेखील अधिक प्रमाणात आहे.

दरम्यान ज्या भागात पाऊस कमी झाला त्या ठिकाणी झेंडुचे उत्पादन चांदले आले. या शेतकऱ्यांचा माल सध्या बाजारात येत आहे. सध्या



बाजारात लाल पिवळ्या रंगांची झेंडूची फुले आहेत. यामध्ये लाल -केशरी रंगात ऑरेंज, कलकत्ता, जंबो आदी जाती आहेत; तसेच पिवळ्या रंगात 'स्मार्ट यलो', कांचन, श्रावणी जातीची फुले विक्रीसाठी आली आहेत. पिवळ्या झेंडूचा दर शंभर रुपये किलोपर्यंत पोहचला आहे. मागणी अधिक असल्याने केशरी रंगाच्या झेंडूचा दर किलोला शंभरी पार करत सव्वाशे झाला आहे. शेवंतीच्या फुलाचीसुद्धा आवक आहे. शेवंतीचा दर सध्या दीडशे ते दोनशे रुपयापर्यंत आहे. घाऊक बाजारात पुणे व मुंबई येथे सातारा, सांगली येथून जास्त आवक आहे. यंदा महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने फूलबागांचे नुकसान झाले आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत कर्नाटकमधील बंगळुरूला जेमतेम पाऊस असल्याने बागा वाचल्या आहेत. पुण्या-मुंबईच्या फुलांच्या घाऊक बाजारात बंगळुरूची फुले सध्या मोठ्या प्रमाणात येत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. स्थानिक फुलांच्या दराला परप्रांतांतील फुलांची स्पर्धा करावी लागत आहे. जिल्ह्यात सातारा, वाई, खटाव, माण, फलटण, कोरेगाव, खंडाळा, जावळी, कराड तालुक्यांत शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात झेंडूची लागवड करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु पाणी साचणाऱ्या शेतामध्ये यंदा सततच्या पावसाने उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. पावसाने उघडीप दिल्याने दसरा, दिवाळी डोळ्यासमोर ठेवून शेतकरी झेंडूची चांगलीच काळजी घेत आहेत. दर मिळण्याच्या आशेने काही नव्याने लागवड करण्याच्या तयारीत आहेत.

सणासुदीच्या दिवसांत देवाला हार आणि सजावटीसाठी फुलांचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येतो. उत्सव काळात वाढणारे दर यामुळे अलीकडे काही लोक प्लॅस्टिकच्या कृत्रिम फुलांचे हार, माळा याचा अधिक वापर करतात. जास्त दिवस टिकत असल्याने लोकांचा त्यांकडे कल वाढला आहे. सध्या बाजारात रंगीबेरंगी कृत्रिम फुलांची रेलचेल आहे. त्यांनी खऱ्या फुलांपुढे स्पर्धा निर्माण केली आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
मध्य मुंबई (सा.बां) विभाग, गणपत जाधव मार्ग,
वरळी, मुंबई - ४०० ०१८.

Email :- centralmumbai.ee@mahapwd.gov.in | ☎ ४९३६४०४/२४९३११०२ फॅक्स २४९३११०२
जा.क्र. का.अ./मर्मुवि/निविदा/५४०२ | दिनांक :- १०/०९/२०२४

ई निविदा सूचना क्रमांक ०४ सन (२०२४-२५)

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३११०२/२४९३६४०४ महाराष्ट्र शासनच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील मजूर सहकारी संस्था मर्यादित यांचेकडून ०४ कामाकरीता (१०० लक्ष पेक्षा जास्त) किंमतीच्या कामांची ई-निविदा http://mahatenders.gov.in/http://mahapwd.gov.in मागवित आहेत. सर्व मजूर सहकारी संस्थां,मुंबई जिल्हा यांनी प्रचलित नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी - | दि.१३.०९.२०२४, सकाळी १५.०० पासून ते दि.१९.०९.२०२४ रोजी १५.०० पर्यंत |
| ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) | दि.२०.०९.२०२४ रोजी १५.०० वाजता (कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, यांचे कार्यालय, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०००१८) |

कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई (सा.बां) विभाग,
वरळी, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/२९४०

# प्रशासकीय भवनाच्या विकासाचा मार्ग मोकळा, 'त्या' तीन गाळे मालकांचा दावा दिवाणी न्यायालयाने फेटाळला

**■ पनवेल : आकांक्षा नार्वेकर**

पनवेल प्रशासकीय भवनाच्या जागेतील बचतधाममधील तीन गाळेधारकांनी १० वर्षांपूर्वी पनवेलच्या तहसीलदारांविरोधात दिवाणी न्यायालयात धाव घेऊन शासकीय जागेतील भाडेकरू असल्याचा दावा करून ही जागा ताब्यात राहण्यासाठी दिवाणी न्यायालयात दावा केला होता. हा दावा मागील आठवड्यात पनवेल जिल्हा दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश कृ. मु. सोनावणे यांच्या सुनावणीत नामंजूर करण्याचे आदेश दिल्यामुळे पनवेलच्या प्रशासकीय भवनाच्या इमारतीचा संपूर्ण विकास करण्याचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांनी दिली. जुन्या पनवेल तहसील कचेरीच्या कार्यालयालगत सुसज्ज इमारत बांधकामासाठी सर्व सरकारी कार्यालयांना स्थलांतरित केल्यानंतर तहसीलदारांनी जुन्या कचेरीलगतच्या सिटी सर्व्हे मालमत्ता क्रमांक ७०२ वरील ६३३.८ चौरस मीटरच्या क्षेत्रावर मुलकी बचतधाम या नावाने ओळखल्या जाणाऱ्या तळमजला आणि त्यावर एक मजला या इमारतीमधील गाळेधारकांना जागा स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू केल्यानंतर गाळेधारकांनी १९९९ सालच्या महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियमानुसार संबंधित जागेचा ताबा स्वत:कडे राहण्यासाठी न्यायालयात धाव घेत अलिबाग येथील कल्याणनिधीचे कुलाबा



(रायगड) जिल्हा मुलकी सेवकवर्गाचे अध्यक्ष पनवेल तहसीलदारांविरोधात दावा केला होता. याच दाव्याचे प्रकरण न्यायाधीश कृ. मु. सोनावणे यांच्यासमोर सुरू होते.

पनवेलचे तहसीलदार यांच्या वतीने सरकारी वकील श्रीमती एम. आर. थळकर यांनी न्यायालयात बाजू मांडली. बचतधामला तीन गाळे या मालमत्तेत देण्यात आले होते. मात्र शासकीय जागेतील गाळेधारकांना महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम लागू होत नसल्याने हा दावा नामंजूर करण्यात आल्याचे आदेश न्यायाधीश सोनावणे यांनी दिले. संबंधित प्रकरणात न्यायालयातील सर्व कायदेशीर प्रक्रिया पार पाडून निकाल मिळण्यासाठी १० वर्षे ११ महिन्यांचा कालावधी लागला. भवनाचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सांगितले जात असून रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत आणि सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या एकत्रित तारखा मिळत नसल्याने या भवनाचा लोकार्पण सोहळा पुढे ढकलला जात असल्याची चर्चा आहे. सध्या या इमारतीमधील पूर्वाश्रमीची सरकारी कार्यालये इतर भाड्याच्या जागेत सुरू आहेत. विविध सरकारी कार्यालये एका भवनाच्या इमारतीत झाल्यास नागरिकांचे हेलपाटे वाचतील या उद्देशाने सरकारने १० वर्षांपूर्वी पनवेलचे प्रशासकीय भवन बांधण्याचे काम हाती घेतले.

## गणेश मुर्ती मोडतोडीनंतर भिवंडीत तणाव

**■ ठाणे : तृप्ती गोरे**

भिवंडी येथील पद्मानगर भागातील गणेश मुर्ती कारखान्यातील ५० ते ६० मुर्तींची मोडतोड करण्यात आल्याचा प्रकार शुक्रवारी रात्री उघडकीस आला आहे. या घटनेनंतर भिवंडीत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलीस तसेच लोकप्रतिनिधींनी जमावाला शांत केल्यानंतर येथील तणाव निवळला. याप्रकरणी भिंवडी शहर पोलीस ठाण्यात अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पद्मानगर येथील भाजी बाजार परिसरात गणेश मुर्तींचा कारखाना आहे. या कारखान्यात काही गणेश मुर्ती होत्या. दोन दिवसांपूर्वी कारखान्याचे मालक राजेंद्र गादी यांनी कारखाना बंद केला होता. शुक्रवारी रात्री त्यांनी कारखाना उघडला असता,



५० ते ६० गणेश मुर्तींची मोडतोड झाल्याचे आढळून आले. या प्रकारानंतर ५०० ते ६०० नागरिक तेथे जमले.

त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांचा फौजफाटा परिसरात तैनात करण्यात आला. आमदार महेश चौघुले, पोलीस उपायुक्त श्रीकांत परोपकारी, माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांच्यासह काही नागरिकांनी जमावाला शांत केल्याने तणाव निवळला. मोडतोड झालेल्या मुर्ती वाहनांमध्ये नेऊन त्याचे वऱ्हाळ देवी तलावामध्ये विसर्जन करण्यात आले. तर मुर्ती शनिवारी पहाटे भिवंडी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सीसीटीव्हीच्या माध्यमातून आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## मिरा-भाईंदर महापालिकेत मोठे फेरबदल, २५३ अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या बदलीचे आदेश जारी

**■ भाईंदर: सतिश सोनावणे**

मिरा भाईंदर महापालिकेत आयुक्त संजय काटकर यांनी शुक्रवारी तब्बल २५३ अधिकारी आणि कर्मचारी यांच्या अंतर्गत



बदल्या केल्या आहेत. यात सहायक आयुक्त, अभियांत्रिकी, लिपिक, शिक्षक ते शिपायांपर्यंत बदल्या करण्यात आल्या आहेत. प्रामुख्याने या बदली आदेशात प्रभाग स्तरावरील कामकाजात सूसुत्रता यावी म्हणून पाच सहाय्यक आयुक्ताच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यात काही दिवसापूर्वीच प्रभाग क्रमांक ६ च्या प्रभाग अधिकारी पदाची जबाबदारी सोपवलेल्या नरेंद्र चव्हाण कडून हा विभाग काढून घेत त्यांना पुन्हा अतिक्रमण विभागात हलवण्यात आले आहे. तर मध्यंतरी चर्चेत आलेल्या प्रभाग अधिकारी जितेंद्र कांबळे यांना प्रभाग ३ येथून प्रभाग क्रमांक १ येथे पाठवण्यात आले आहे. याशिवाय प्रियंका भोसले यांना प्रभाग क्रमांक ५ आणि कांचन गायकवाड यांना प्रभाग क्रमांक सहा ची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तसेच स्वच्छतेच्या तक्रारी वाढू लागल्यानंतर १५१ सफाई कर्मचाऱ्यांच्या व २२ मजुरांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

## दंतचिकित्सकांना सौंदर्य आणि केस प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्याला आव्हान

**■ मुंबई : विशाल कारंडे**

सौंदर्य आणि केस प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करणाऱ्या दंतचिकित्सकांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी त्वचारोगतज्ज्ञांच्या संघटनेने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.पात्रता नसतानाही दंतचिकित्सकांकडून सौंदर्य आणि केस प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केली जात आहे, असा दावा द डायनॅमिक डर्मेटोलॉजिस्ट अँड हेअर ट्रान्सप्लांट असोसिएशनने जनहित याचिकेद्वारे केला आहे. तसेच, संघटनेने ६ डिसेंबर २०२२ रोजी भारतीय दंतवैद्यक परिषदेने प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना आव्हान दिले आहे. या नियमांनुसार, देशभरातील मौखिक आणि मॅक्सिलोफेशियल चिकित्सकांना सौंदर्य आणि केस प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्याची परवानगी देण्यात आली. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या



खंडपीठासमोर ही याचिका गुरूवारी सुनावणीसाठी आली. त्यावेळी, नव्या भारतीय दंतवैद्यक आयोग कायद्यानुसार केंद्रीय दंतवैद्यक आयोग अस्तित्वात आहे की नाही याबाबत न्यायालयाने विचारणा केली. तसेच, त्याबाबतची भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. शिवाय, आयोग अस्तित्त्वात असल्यास आयोगाला प्रतिवादी करण्याचे आदेश दिले जातील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

त्याचवेळी, भारतीय वैद्यक परिषदेने देखील या मार्गदर्शक तत्त्वांना मान्यता दिल्याकडे मुख्य न्यायमूर्तीनी लक्ष वेधले. तसेच, भारतीय वैद्यक परिषद ही एक घटनात्मक संस्था असून तिनेही दंतचिकित्सकांना सौंदर्य आणि केस प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्याची परवानगी दिली आहे. त्याचप्रमाणे, हे दंचचिकित्सक ही शस्त्रक्रिया करण्यास सक्षम असतील तर त्यात गैर काय, असा प्रश्नही मुख्य न्यायमूर्तीनी केला. त्याचवेळी, आम्ही या विषयातील तज्ज्ञ नाही.

## पालिकेच्या व्हीआयपींच्या यादीत राजकारण्यांचा भरणा; शहरातील मान्यवर नागरिकांना वगळले

**■ वसई : गणेश बागडे**

वसई विरार महापालिकेने शहरातील अतिमहत्वाच्या २४५ व्यक्तींची (व्हीआयपी) यादी प्रसिध्द केली आहे. त्यामध्ये फक्त विविध शासकीय अधिकारी आणि राजकारण्यांचा भरणा करण्यात आला आहे. वसई विरार शहरात विविध क्षेत्रातील मान्यवर असताना त्यापैकी एकाचाही यादीत



समावेश नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

वसई विरार महापालिका विविध उपक्रम राबवत असते. या उपक्रमांसाठी शहरातील मान्यवरांना आमंत्रण देण्यात येते. अशा कार्यक्रमात त्यांना मानाचे स्थान देण्यात येत असते. यासाठी पालिकेने शहरातील अतिमहत्वाच्या व्यक्तींची यादी तयार करण्यात आली आहे. या यादीतील लोकांना अतिमहत्वाचा दर्जा देण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ दिनेश कांबळे यांनी या अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या यादीत कोण आहे त्याची माहिती माहिती अधिकारात विचारली होती. पालिकेने दिलेल्या यादीत २४५ जणांचा समावेश आहे. या यादी मध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यी राज्याचे सचिवांपासून आजी माजी खासदार, आजी माजी नगरसेवक, सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे. मात्र शहरातील एकही साहित्यिक, कलावंत, चित्रकार, खेळाडू, डॉक्टर्स, प्राध्यापक यांचा समावेश नाही. याबद्दल नाराजी व्यक्त होत आहे.

वसई विरार महापालिकेने यादी तयार करताना सर्वच क्षेत्रातील महत्वाच्या व्यक्तींना स्थान देणे आवश्यक होते. वसई शहरात अनेक राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर नावाजलेले मान्यवर राहतात. त्यांचा यादीत समावेश केला असता तर पालिकेची शोभा वाढली असती. परंतु केवळ राजकारणी, पोलीस, पालिका आणि शासकीय अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे, असे कांबळे यांनी सांगितले. राज्याचे सचिव, मंत्री, माजी अधिकारी यांचा तर राजशिष्टाचार असतो. मग पुन्हा त्यांना यादीत स्थान का असा सवालही त्यांनी केला.

## बेकायदा नळजोडणीधारकांपाठोपाठ थकबाकीदारांवर कारवाई: ठाणे महापालिकेने थकबाकीदारांच्या ११ नळजोडण्या तोडल्या

**■ ठाणे : तृप्ती गोरे**

ठाणे महापालिका पाणी पुरवठा विभागाने बेकायदा नळजोडण्याविरोधात सुरू केलेल्या विशेष मोहिमेत ९७ नळजोडण्या खंडीत करण्यात आल्या असतानाच, त्यापाठोपाठ आता शहरातील पाणी देयक थकबाकीदारांविरोधात पालिका प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. या कारवाईत शिळ-दिवा भागात ६ मोटर पंप जप्त करण्यात आले आहेत. तर, ११ नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या आहेत. पाणी देयकाचा भरणा न करता, खंडित नळ जोडणी परस्पर पुन्हा कार्यान्वित करुन घेतल्यास गुन्हे दाखल करण्याचीही कारवाई करण्यात येणार आहे. यामुळे बेकायदा नळजोडणीधारकांपाठोपाठ थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत.

ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी गेल्या आठवड्यात पाणी देयक वसुलीबाबत पाणी पुरवठा विभागाचे अभियंता आणि मीटर रिडर यांची बैठक घेतली. या बैठकीत, मीटर रीडरना साप्ताहिक उद्दीष्ट निश्चित करून देण्याबरोबरच अवैध नळ जोडण्या खंडित करण्याचे निर्देश माळवी यांनी दिले होते. अनधिकृत इमारतींमध्ये पाण्याचा वापर सुरू असल्यास त्यावरही गुन्हे दाखल करण्याचे निर्देश त्यांनी दिले होते. या आदेशानंतर पाणी पुरवठा विभागाने मुंब्रा आणि दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील ९७ बेकायदा नळ जोडण्या खंडित करत याप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची कारवाई सुरू केली होती. त्यापाठोपाठ आता थकीत पाणी देयकांच्या वसुलीसाठी पाणी पुरवठा विभागाने पाऊले उचलली आहेत.

पाणी देयक थकबाकीदारांच्या नळ जोडण्या खंडित करून पाणी



पुरवठा बंद करण्याची कारवाई पाणी पुरवठा विभागाने सुरू केली असून याबाबत अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी बैठकीत स्पष्ट निर्देश दिले आहेत. पाणी पुरवठा विभागाने देयकाच्या साप्ताहिक वसुलीचे लक्ष्य निर्धारित केले आहे. पाणी देयकाच्या थकबाकीसह वसुलीसाठी महापालिकेच्या सर्व प्रभागात नळ जोडणी खंडीत करणे, मोटर पंप जप्त करणे, मीटर रुम सील करण्यात येत आहेत. तसेच, पाणी देयकाचा भरणा न करता, खंडित नळ जोडणी परस्पर पुन्हा कार्यान्वित करुन घेतल्यास गुन्हे दाखल करण्याचीही कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती उपनगर अभियंता (पाणीपुरवठा) विनोद पवार यांनी दिली. ठाणे महापालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये विविध विभागांना पाणी वसुलीचे उद्दीष्ट ठरवून देण्यात येते. यंदाच्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठा विभागाला पाणी देयकांपोटी २२६ कोटींच्या वसुलीचे उद्दीष्ट ठरवून देण्यात आले असून ते पार करण्यासाठी पाणी पुरवठा विभागाने देयक वसुलीवर लक्ष केंद्रीत केले आहे. याशिवाय, पाणी देयकांची ७७ कोटींची थकबाकी आहे. ही वसुली करण्यासाठी पालिकेने आता नळजोडण्या खंडीतची कारवाई सुरू केली असून यामध्ये ११ नळजोडण्या खंडीत केल्या आहेत.

## भाईंदर शहराला डेंगू-मलेरियाचा धोका; महिन्याभरात रुग्ण संख्या चारपट

**■ भाईंदर : प्रथमेश चव्हाण**

मिरा-भाईंदर शहरात डेंगू आणि मलेरिया आजाराने हातपाय पसरण्यास सुरुवात केली आहे. मागील महिन्याभरात बाधित रुग्ण संख्येत चार पटाहून अधिकची वाढ झाली असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पालिकेकडून नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे



आवाहन करण्यात येत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फ़त शहरात डेंगू व मलेरिया सारख्या साथीच्या आजाराचा प्रसार होऊ नये म्हणून विविध स्वरूपाच्या उपाय योजना आखण्यात येतात. यात प्रामुख्याने औषध फवारणी, पाणी शुद्धीकरण आणि स्वच्छतेचा समावेश आहे. मात्र तरी देखील डेंगू व मलेरिया या साथ रोग आजाराची लागण होऊन बाधित होणाऱ्याचे प्रमाणात पालिका दप्तरी वाढतच असल्याचे दिसून येते.त्यामुळे प्रशासनाच्या चिंतेत मोठी भर पडली आहे. शहरात जुलै महिन्यात डेंगू आजाराने बाधित असलेल्या संशयित रुग्णांची संख्या ही २२ इतकी होती. मात्र ऑगस्ट महिन्या अखेरीस हा आकडा ६७ वर पोहचला होता.याच प्रमाणे जुलै महिन्यात मलेरिया आजाराचे १९ संशयित रुग्ण असताना हा आकडा ऑगस्ट महिन्यात तब्बल ७२ पोहचला आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाता वेळेत उपचार घेण्याचे आवाहन मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रमोद पडवळ यांनी केले आहे.

## यंदाचा गणेशोत्सव बचत गटांसाठी आर्थिक फलदायी, विविध वस्तू आणि खाद्यपदार्थ विक्रीतून १५ लाखांहून अधिकची आर्थिक उलाढाल

**■ ठाणे : प्रतिनिधी**

गणेश उत्सवासाठी लागणाऱ्या शोभेच्या वस्तू, मखर, विद्युत रोषणाई, हाताने बनविलेल्या फुलांच्या टोपल्या यांसह विविध खाद्य पदार्थांची यंदा महिला बचत गटांकडून मोठ्या प्रमाणात विक्री करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे नागरिकांकडूनही घरगुती वस्तूंनाच प्राधान्य दिले गेले असल्याने बचत गटांना यंदाचा गणेशोत्सव आर्थिक दृष्ट्या फलदायी ठरला असून जिल्ह्यातील महिला बचत गटांची सुमारे या वस्तू विक्रीतून १५ लाख रुपयांची आर्थिक उलाढाल झाली आहे. ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, मुरबाड, शहापूर, कल्याण, भिवंडी या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बचत गट कार्यरत आहेत. जिल्ह्यातील बचत गटांची संख्या सुमारे दहा हजार इतकी असून यामध्ये एक लाख महिला जोडल्या गेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, यांचे कार्यालय
Email :- integratedmumbai.ee@mahapwd.com
दुरध्वनी क्र. २२०१६९७४ फॅक्स क्र. २२०१६९७६
ई-निविदा सुचना क्र. १२ सन २०२४-२५

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई-०१ (दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता "ब-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | मंगळूर टाइल छताची जीर्णोद्धार आणि संवर्धन, बाह्य दर्शनी भाग आणि रूग्णांच्या वॉर्ड. स्वच्छतागृहे, पॅसेज, जिना आणि वेदर शेड यांचे नूतनीकरण सर जे.जे. हॉस्पिटल कंपाऊंड, भायखळा, मुंबई. | २,४९,६६,०५५/- |

(एकूण ०१ कामे)

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक १०/०९/२०२४ सकाळी १०.३० पासून ते दिनांक १७/०९/२०२४ रोजी १५.०० पर्यंत

निविदा पूर्व बैठक : दिनांक १३/०९/२०२४ रोजी दुपारी १५.०० वाजता
मा. अधीक्षक अभियंता,
बांधकाम भवन, ५ वा मजला, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई-४०० ००१

ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दिनांक १८/०९/२०२४ रोजी १५.०५ वाजता

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र. काअ/एघ(सा.बां.)/निविदा/ ४४५४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
बांधकाम भवन, २ रा मजला,
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०१६९७४/७६
दिनांक : ०२/०९/२०२४

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
फोर्ट, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/२८००

## आनंद आश्रमात नोटांची उधळण, दिघे साहेबांचे विश्वासू नंदू गोरूले संतापले

**■ ठाणे : तृप्ती गोरे**

शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांच्या आनंद आश्रमात काही दिवसांपूर्वी शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी नोटांची उधळण केली. हा व्हिडीओ सोशल मिडीयावर प्रसारित झाल्यानंतर आता विरोधी पक्षातील नेत्यांकडून शिंदे गटावर टीका केली जात आहे. आनंद दिघे यांचे पत्रव्यवहार पाहणाऱ्या नंदकुमार गोरूले यांनीही याप्रकरणानंतर संताप व्यक्त केला. त्यांनी शिंदे गटावर टीका करत 'सोन्याच्या पेना'ची आठवण देखील सांगितली.

ठाकरे गटाचे माजी खासदार राजन विचारे यांच्या चरई येथील कार्यालयात आनंद आश्रम येथील नोटांच्या उधळणी प्रकरणी एक पत्रकार परिषद झाली. या पत्रकार परिषदेमध्ये नंदकुमार गोरूले उपस्थित होते. १९८५ ते १९९५ या कालावधीत गोरूले यांनी आनंद दिघे यांचे पत्रव्यवहाराचे कार्य सांभाळले. त्यांनी आनंद दिघे यांच्या मुलाखती देखील लिहील्या आहेत. आनंद दिघे यांची प्रकृती अस्थिर असताना त्यांची सेवा मी केली असा दावा गोरूले यांनी केला आहे. त्यांनी शिंदे गटावर याप्रकरणावरून गंभीर आरोप केले. ते म्हणाले सर्वजण पैशांना वश झाला आहात का? माझ्या साहेबांना तुम्ही पैशांनी



ओवाळताय? मराठी, हिंदू सणांचा एक आदर्श वस्तूपाठ म्हणून टेंभीनाक्यातील आनंद आश्रमाकडे पाहिले जात होते. त्याचे आचरण-अनुकरण देशभर व्हायचे. देशभरातील माणसे आनंद आश्रमात यायचे आणि आज तुम्ही सांगत आहात, साहेबांनी ही पंरपरा पाडली. साहेबांच्या नावाने काय-काय खपवता? एवढा पैसा मोठा झाला की, माझ्या साहेबांना तुम्ही विकत घ्याल अशी टीका त्यांनी केली. आनंद दिघे यांची एक आठवण देखील त्यांनी सांगितली. एक मराठी उद्योजक होते. ते दुबईला पळून गेले असते किंवा त्यांनी आत्महत्या केली असती. अशा माणसाला साहेबांनी वाचविले होते. त्यांना कृतज्ञता म्हणून दिघे साहेबांना काहीतरी द्यायचे होते. माझा भाऊ त्या उद्योजकाचा मित्र होता. त्याने त्या उद्योजकाला समजावले की, साहेबांना काहीही देऊ नका, हे धाडस करू नकाष्ठ परंतु त्यांचे म्हणणे होते काहीतरी साहेबांना द्यायचे आहे. त्यामुळे त्या उद्योजकाने दुबईहून एक सोन्याचा पेन आणला होता. ते उद्योजक आनंद आश्रमात आले. साहेब समोर बसले होते. मी स्वत: देखील साहेबांसोबत होतो. ते साहेबांच्या पाया पडले आणि 'साहेब तुम्ही मला वाचविले, त्यामुळे स्वाक्षरी करण्यासाठी हा सोन्याचा पेन घ्या' असे म्हणाले.

## जातनिहाय जनगणनेसाठी मोदी सरकारची तयारी? निर्णयाचं घोडं मात्र अडलेलंच?

**■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोव्हिड आल्याने लांबणीवर पडलेली जातनिहाय जनगणना अद्यापही झालेली नाही. आता करोना काळ संपूनही दोन वर्षे झाली आहेत तरीही याबाबत ठोस निर्णय झालेला नाही. दरम्यान अशी माहिती समोर येते आहे की मोदी सरकार जातनिहाय



जनगणना करण्यासाठी तयार आहे. त्यासाठीचा आरखडाही तयार करण्यात येतो आहे असं कळतं आहे. मात्र अद्याप कुठलाही ठोस निर्णय झालेला नाही. आपल्या देशात १८८१ पासून दर दहा वर्षांनी जातनिहाय गणना केली जाते. २०११ नंतर २०२१ मध्ये जातनिहाय जनगणना होणं अपेक्षित होतं. मात्र देशभरात करोना असल्याने हा निर्णय लांबणीवर गेला.

# सायबर चोरट्यांनी हद्दच केली, मुंबईतील वकील महिलेला चौकशीच्या नावाखाली विवस्त्र होण्यास भाग पाडल

■ मुंबई : विशेष प्रतिनिधी

सायबर घोटाळ्याबाबत रोज नवनवीन बातम्या समोर येत असतानाही त्याच प्रकारच्या सायबर फसवणुकीला लोक आताही बळी पडत आहेत. शेअर ट्रेडिंग, मनी लॉंडरिंगचा गुन्हा दाखल झाला आहे किंवा तुमच्या घरातील मुलगा किंवा मुलगी एका प्रकरणात अडकले असल्याची बतावणी करून सायबर चोरटे अनेकांना गंडा घालत आहेत. विशेष करून उच्चशिक्षित लोकही अशा फसवणुकीला बळी पडत असल्याचे दिसते. मुंबईतील महिला वकिलाची अशाच प्रकारे फसवणूक झाली असून चोरट्यांनी पैशांसह या महिलेचे नग्न फोटो आणि व्हिडीओही मिळवले आहेत.

मुंबईतील ३६ वर्षीय वकिल महिलेला बुधवारी दुपारी एक कॉल आला. ज्यामध्ये तिच्याविरोधात एफआयआर दाखल झाला असल्याचे समोरच्या व्यक्तीने सांगितले. जेट एअरवेजचे संस्थापक नरेश गोयल यांच्याशी संबंधित एका प्रकरणात या महिला वकिलाचेही नाव गुंतले असल्याचे तिला सांगण्यात आले. नरेश गोयल यांना ईडीने आर्थिक घोटाळ्यात अटक केली होती, मात्र ते आता जामीनावर बाहेर आहेत. गोपनीय चौकशी करायची असल्यामुळे आणि पोलीस स्थानकात येण्यापेक्षा त्रयस्थ ठिकाणी चौकशी करू, असे सांगून या महिलेला पवई येथील एका हॉटेलमध्ये जाण्यास सांगितले गेले. तिथे गेल्यावर एका महिला अधिकाऱ्याकडून पीडित महिलेच्या शरीरावरील जखमा आणि




काही शस्त्र बाळगले आहे का? याची खातरजमा करण्यासाठी पीडितेला विवस्त्र होण्यास सांगितले गेले. तसेच तिच्या खात्यातून ५० हजार रुपये चोरट्यांनी आपल्या खात्यात वळविण्यास सांगितले. हा प्रकार सुरू असताना महिलेला आपली फसवणूक होत असल्याचा संशय आला. त्यानंतर तिने थेट पवई पोलीस ठाणे गाठले. सायबर चोरट्यांच्या कॉल आणि मेसेजला उत्तर न दिल्यामुळे अखेर चोरट्यांनी तिचे नग्न फोटो तिलाच पाठवून आणखी पैशांची मागणी करायला सुरुवात केली. पोलिसांनी सांगितले की, जेव्हा महिलेला पहिला फोन आला तेव्हा, समोरच्या व्यक्तीने तो ऊँ्‌ मधून बोलत असल्याचे सांगितले होते. पीडितेचे सीम कार्ड मनी लॉंडरिंग प्रकरणात वापरले गेले असून ते लवकरच ब्लॉक केले जाणार असल्याची भीती दाखविली. महिलेने आपल्या तक्रारीत म्हटले की, पहिला फोन आल्यानंतर मला पवई सायबर सेलमधून दुसरा फोन आला. पलीकडून बोलणाऱ्या व्यक्तीने तो पोलीस अधिकारी असल्याचे सांगितले होते. त्यानेच मला अटक टाळण्यासाठी हॉटेलमध्ये जाण्याचा सल्ला दिला. मी घाबरले, अटक होण्याची भीतीने हॉटेलमधील रुम बुक करून तिथे गेले, असे पीडितेने सांगितले. हा फसवणुकीचा प्रकार होत असताना महिलेला याबद्दल कुणालाही माहिती न देण्याची भीती दाखवले.

## विश्वचषक सामन्यांच्या तिकीटांचे आमिष दाखवून १८ लाखांची फसवणूक

■ मुंबई : विशेष प्रतिनिधी

गेल्या वर्षी भारतात झालेल्या क्रिकेट विश्वचषक सामन्यांचे तिकीटे देण्याचे आमिष दाखवून मरीन ड्राईव्ह येथील व्यापाऱ्याची १८ लाख रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली बंगळुरूमध्ये राहणाऱ्या महिलेसह दोघांविरोधात मुंबई पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली. तक्रारदार हर्ष भार्गव (३८) मरीन ड्राईव्ह परिसरात राहतात. त्यांच्या तक्रारीवरून बंगळुरू येथे राहणाऱ्या प्रीती एस. ए. पद्मनाभन व एका अनोळखी व्यक्तीविरोधात मरीन ड्राईव्ह पोलिसांनी भादंवि कलम ४२० व ३४ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तक्रारनुसार, २०२३ मधील




क्रिकेट विश्वचषक सामन्यांची तिकीटे आहे त्या किमतीत देण्याचे आश्वासन दिले होते. विश्वास संपादन करण्यासाठी सुरूवातीला तक्रारदाराला काही तिकीटेही देण्यात आली. त्यानंतर तक्रारदाराने २४ लाख २७ हजार रुपये त्यांची बहिण व वडिलांच्या बॅंक खात्यातून आरोपी महिलेला पाठवले. तक्रारदाराने २० ऑक्टोबर, २०२३ ते १२ नोव्हेंबर, २०२३ या कालावधील ही रक्कम हस्तांतरित केली. त्यानंतर तक्रारदाराला तिकिटे मिळाली नाहीत. त्यामुळे तक्रारदाने पैशांची मागणी केली असता त्यांना केवळ पाच लाख ४५ हजार रुपये परत करण्यात आले. उर्वरीत १८ लाख ८२ हजार रुपये तक्रारदाराला परत करण्यात आले नाहीत. त्यामुळे तक्रारदाराने संबंधित महिला व तिच्या सहकाऱ्यांविरोधात नुकतीच मरीन ड्राईव्ह पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला सुरूवात केली आहे.

## नावातील साधर्म्याचा फायदा घेऊन १६ कोटींच्या शेअर्सची परस्पर विक्री

■ मुंबई : विशेष प्रतिनिधी

नावातील साधर्म्याचा फायदा घेऊन १६ कोटी रुपयांचे शेअर्स स्वतःच्या खात्यात वळते करून त्याची विक्री केल्याप्रकरणी दहिसर येथील एमएचबी पोलिसांनी




गुजरातमधील एका महिलेसह तिघाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. आरोपींनी बनावट कागदपत्रांचा वापर केला असून याप्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा करीत आहे.

वनिता गांधी व सुधा गांधी यांच्या नावावर २०१७ मध्ये बाळकृष्ण इंजस्ट्रीजचे ५४ हजार शेअर्स होते. गुजरातमधील वडोदरा येथील वनिता गांधी या महिलेच्या डिमॅट खात्यावर हे शेअर्स वळते करण्यात आले. त्यानंतर त्यांची १६ कोटी २० लाख रुपयांना विक्री करण्यात आली. याप्रकरणी वनिता गांधी यांच्यावतीने त्यांचे सल्लागार वैभव जोशी यांनी तक्रार केली असून एमएचबी पोलीस ठाण्यात तोयगारिकी करणे, फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुजरातमधील वडोदरा येथे राहणाऱ्या तोतया महिलेसह शेअर्स खरेदी-विक्री करणाऱ्या कंपनीसह दोन कंपन्यांतील अज्ञात कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा करणार आहे. बनावट कागदपत्रांच्या साह्याने केवायसी करून सर्व शेअर्स डीमॅट खात्यात हस्तांतरित करण्यात आले.

## मुंबई उच्च न्यायालयाकडून अटक वॉरंटची बतावणी; सायबर चोरट्यांकडून एकाची १२ लाखांची फसवणूक

■ पुणे : विशेष प्रतिनिधी

मुंबई उच्च न्यायालयाकडून अटक वॉरंट बजाविण्यात आल्याची बतावणी करून सायबर चोरट्यांनी वानवडी भागातील एकाची पावणेबारा लाख रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एकाने वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदाराच्या मोबाइल क्रमांकावर सायबर चोरट्यांनी संपर्क साधला होता. तुम्ही एका खासगी बॅंकेकडून पावणेतीन लाख रुपयांचे कर्ज घेतले आहे. कर्जाची परतफेड न केल्याने मुंबई उच्च न्यायालयाकडून अटक वॉरंट बजाविण्यात आले आहे, अशी बतावणी सायबर चोरट्यांनी तक्रारदाराकडे केली. त्यानंतर चोरट्यांनी




मुंबईत पोलीस दलात असल्याचे सांगून अटक टाळण्यासाठी तातडीने पैसे भरावे लागतील, अशी धमकी दिली. तक्रारदाराला चोरट्यांनी एका बॅंक खात्यात पैसे जमा करण्यास सांगितले. तक्रारदाराने चोरट्यांच्या बॅंक खात्यात वेळोवेळी ११ लाख ७९ हजार रुपये जमा केले. चोरट्यांनी पुन्हा त्यांच्याकडे पैसे मागितले. संशय आल्याने तक्रारादराने शहानिशा केली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसंकडे तकार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पतंगे तपास करत आहेत. बॅंकेची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची बतावणी सायबर चोरट्यांनी कोथरुड भागातील एका महिलेची नऊ लाख २८ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत एका महिलेने अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस निरीक्षक चव्हाण तपास करत आहेत.

## वसई येथील पाच अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचाराचे प्रकरण: आरोपीची जन्मठेप उच्च न्यायालयाकडून कायम

■ मुंबई : विशेष प्रतिनिधी

एकाच गावात राहणाऱ्या ८ ते १३ वर्षे वयोगटातील पाच अल्पवयीन मुलींवर दोन वर्षांच्या कालावधीत अनेकदा लैंगिक अत्याचार करणाऱ्या ५० वर्षांच्या आरोपीला सत्र न्यायालयाने सुनावलेली जन्मठेपेची शिक्षा



उच्च न्यायालयाने गुरूवारी कायम केली. वसई येथील सत्र न्यायालयाने २९ मार्च २०१४ रोजी आरोपीला त्याच्यावरील आरोपांत दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या मुली आरोपीला मामा म्हणत.

वैद्यकीय पुरावे आणि लैंगिक अत्याचाराच्या घटनेचे साक्षी असलेल्यांनी दिलेल्या साक्षीतून आरोपीने पाचही अल्पवयीन पीडित मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचे स्पष्ट होते, असे नमूद करून न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने आरोपीचे शिक्षेविरोधातील अपील फेटाळून लावले. आपल्याला खोट्या आरोपांत गोवण्यात आल्याचा दावा आरोपीने अपिलात केला होता. तसेच, सत्र न्यायालयाने सुनावलेली शिक्षा रद्द करण्याची मागणी केली होती.

आरोपीने दोन वर्षांहून अधिक काळ पीडित अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केले आणि याबाबत कोणालाही न सांगण्याबाबत धमकावले होते. चौथीत शिकणाऱ्या मुलीने आरोपीला शाळेतील एका मुलीवर लैंगिक अत्याचार करताना पाहिल्यानंतर ही घटना उघडकीस आली. पीडित मुलीच्या आईने पोलिसांत तक्रार दिल्यानंतर, इतर चार मुलींनीही त्यांच्या आईला आपबिती सांगितली.

## बदलापूर अत्याचार प्रकरण: जबाबदारी झटकल्याने ठाणे शिक्षणाधिकाऱ्यांचे निलंबन, राज्य सरकारचा उच्च न्यायालयात दावा

■ मुंबई : विशेष प्रतिनिधी

शालेय मुलांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकारने वेळोवेळी शासननिर्णय काढले आहेत. त्यामुळे, शिक्षणाधिकारी या नात्याने या शासननिर्णयांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात बदलापूर येथील दोन बालिकांवरील अत्याचाराच्या घटनेनंतर निलंबित करण्यात आलेले ठाण्याचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे अपयशी ठरले. शिवाय, घटनेची माहिती उशिरा कळविण्यासाठी त्यांनी इतर अधिकाऱ्यांकडे बोट दाखवून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला, असा दावा राज्य सरकारने गुरुवारी प्रतिज्ञापत्राद्वारे उच्च न्यायालयात केला.

या प्रकरणी राक्षे यांना त्यांच्याविरोधातील प्रस्तावित विभागीय चौकशीला सामोरे जावे लागेल आणि त्याद्वारे त्यांच्यावरील आरोप चुकीचे असल्याचे सिद्ध करावे लागेल. या चौकशीदरम्यान स्वतःचा बचाव करण्याची पूर्ण संधी त्यांना दिली जाईल, असा दावाही सरकारने प्रतिज्ञापत्राद्वारे केला आहे. बदलापूर



घटनेनंतर शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी राक्षे यांना निलंबित केल्याचे जाहीर केले होते. त्याविरोधात राक्षे यांनी आधी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात (मॅट) धाव घेतली होती. तिथे तातडीचा दिलासा न मिळाल्याने त्यांनी उच्च न्यायालयात याचिका केली. न्यायमूर्ती अनिल चांदूरकर आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठासमोर राक्षे यांची याचिका गुरुवारी सुनावणीसाठी आली. त्यावेळी, राज्य सरकारने प्रतिज्ञापत्र दाखल करून राक्षे यांच्याबाबत उपरोक्त दावा केला. राक्षे यांनी मॅटसमोर निलंबलनाला आव्हान देणे चुकीचे असल्याचेही सरकारने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. तसेच निलंबनाच्या आदेशाविरुद्ध राज्यपालांकडे अपील दाखल करणे अपेक्षित होते. परंतु त्यांनी अपील केलेले नाही. राक्षे यांच्या याचिकेवरील सुनावणी शुक्रवारी ठेवताना त्यांच्या जागी पुढील सुनावणीपर्यंत तूर्त कोणाची नियुक्ती करू नका, असे तोंडी आदेश न्यायालयाने राज्य सरकारला दिले.

## डोंबिवलीतील सिस्टर निवेदिता शाळा प्रशासनाविरुध्द गुन्हा, विधानसभा निवडणुकीसाठी कर्मचारी देण्यास दिला होता नकार

■ डोंबिवली : विशेष प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणूक कामासाठी शाळेतील शिक्षक देण्यास महसूल अधिकाऱ्यांना नकार देऊन राष्ट्रीय कर्तव्याच्या कामात कसूर केल्याने डोंबिवली एमआयडीसीतील सिस्टर निवेदिता शाळा प्रशासना विरुध्द मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ प्रमाणे हा गुन्हा दाखल केला आहे.

महसूल विभागाचे डोंबिवली एमआयडीसी परिसराचे तलाठी लक्ष्मण नाना शिंदे यांनी याप्रकरणी उपविभागीय अधिकारी विश्वास गुजर, तहसीलदार सचिन शेजाळ यांच्या आदेशावरून सिस्टर निवेदिता शाळे विरुध्द तक्रार केली आहे. २३ फेब्रुवारी २०२४ ते ५ सप्टेंबर २०२४ या कालावधीत हा प्रकार घडला आहे. पोलिसांनी सांगितले, लोकसभा, विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाला कर्मचारी वर्ग लागतो. हा कर्मचारी वर्ग ठाणे जिल्ह्यातील शासकीय, निम शासकीय, अनुदानित, विना अनुदानित शाळा, महाविद्यालयांच्या माध्यमातून उपलब्ध केला जातो. यामध्ये तांत्रिक महाविद्यालयांचा समावेश असतो. निवडणूक कामासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे काम निवडणूक आयोगाच्या आदेशावरून निवासी उपजिल्हाधिकारी उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांच्या समन्वयातून करतात. तहसिलदारांच्या आदेशावरून स्थानिक मंडळ अधिकारी, तलाठी आपल्या हद्दीतील शाळा, महाविद्यालयांना त्यांच्या शाळेतील शिक्षक आणि इतर कर्मचारी वर्ग निवडणूक कामासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी करतात. आगामी विधानसभा निवडणूक कामासाठी कर्मचारी उपलब्ध करून देण्याची मागणी महसूल विभागाने निवडणूक आयोगाच्या आदेशावरून डोंबिवली, कल्याण परिसरातील शाळा, महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, प्राचार्य यांच्याकडे केली होती. इतर शाळांनी कर्मचारी वर्ग निवडणूक आयोगाला उपलब्ध करून दिला. पण, सिस्टर निवेदिता शाळा प्रशासनाने कर्मचारी वर्ग देण्यास नकार दिला. या शाळेने निवडणूक आयोगाच्या आदेशाचे उल्लंघन केले म्हणून गुन्हा दाखल केला आहे.

## मुंबईत २८५ लिटर भेसळयुक्त दूध जप्त; अन्न व औषध प्रशासनाची मालाडमध्ये कारवाई

■ मुंबई : विशेष प्रतिनिधी

गणेशोत्सवानिमित्त दूध व दूग्धजन्य पदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने हाती घेतलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत मुंबईत करण्यात आलेल्या कारवाईत २८५ लिटर भेसळयुक्त दूध जप्त करून नष्ट करण्यात आले. तसेच याप्रकरणी दोघांविरोधात कारवाई करण्यात आली. देशभरात सप्टेंबर – डिसेंबरदरम्यान विविध उत्सव साजरे करण्यात येतात. या कालावधीत दूध, दूग्धजन्य पदार्थ, मिठाई, मावा, खवा आदी पदार्थांना मोठी मागणी असते.

### बेवारस मृतदेह

अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्र.५४/२०२४ कलम- १९४ भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये अनोळखी बेवारस इसम



वय अंदाजे- ३५ वर्षे, बांधा- सडपातळ, रंग- सावळा, उंची- अंदाजे ५ '४' इंच, नेसणीस सफेद रंगाचा टी शर्ट, काळ्या रंगाची ट्रक पॅन्ट घातलेला इसम अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये मिळून आला असून उपचाराकामी कूपर रुग्णालयात दाखल करण्यात आले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी उपचारादरम्यान मयत घोषीत केले. नमूद इसमाच्या नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यात खालील नंबरवर संपर्क करावा.

**संपर्क -**
**श्री.अरविंद पवार, पोलीस उपनिरीक्षक**
**अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र : ८६९२०००७७७**
**पोलीस ठाणे क्रमांक :**
**०२२२६८३१५६२**

### बेवारस मृतदेह

अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्र.५२/२०२४ कलम- १९४ भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये अनोळखी बेवारस इसम वय अंदाजे- ५५ वर्षे, बांधा- सडपातळ, रंग- सावळा, उंची- अंदाजे ५ '२' इंच, नेसणीस सफेद रंगाचा फुल शर्ट, काळ्या रंगाची फुल पॅन्ट घातलेला इसम अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये मिळून आला असून उपचाराकामी



कूपर रुग्णालयात दाखल करण्यात आले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी दाखलपूर्व मयत घोषित केले. नमूद इसमाचे नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यात खालील नंबरवर संपर्क करावा.

**संपर्क-**
**श्री.विरेंद्र खवळे, पोलीस उपनिरीक्षक**
**अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र : ८१०८४७७१६०**
**पोलीस ठाणे क्रमांक :**
**०२२२६८३१५६२**

## जमिनी शेतकऱ्यांना परत करण्यास सेझ कंपनीची हरकत,पुढील सुनावणी ९ ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलली

■ उरण : विशेष प्रतिनिधी

महामुंबई सेझसाठी पेण, पनवेल आणि उरणमधील शेतकऱ्यांच्या खरेदी करण्यात आलेल्या जमिनी परत करण्याच्या निर्णयाला सेझ कंपनीची हरकत घेतली आहे. त्यामुळे न्यायालयाने सुनावणी ९ ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलली आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी २००५-०६ मध्ये खरेदी करण्यात आल्या आहेत.



त्याचा वापर न झाल्याने त्या परत करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

मात्र शेतकऱ्यांच्या तक्रारीवर निर्णय घेण्याचा रायगड जिल्हा अधिकाऱ्यांना कोणताही अधिकार नसल्याचा दावा करून याप्रकरणी सेझ कंपनीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. यामुळे रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी महामुंबई सेझग्रस्तांची सुनावणी आक्टोबरपर्यंत पुढे ढकलली असल्याची माहिती महामुंबई सेझग्रस्त समितीचे सल्लागार ॲड. दत्तात्रय नवाळे यांनी दिली. महामुंबई सेझसाठी संपादन करण्यात आलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याच्या निर्णयावर चार आठवड्यांत निर्णय देण्याच्या उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बुधवारी (४) झालेल्या सुनावणीत रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी पुन्हा पुढे ढकलली होती. त्यानंतर पुढील अंतिम सुनावणी बुधवारी (११) सप्टेंबर रोजी घेण्यात आली. मात्र आजच्या सुनावणीआधीच महामुंबई सेझ कंपनीने मुंबई उच्च न्यायालयात याप्रकरणी सुनावणी अथवा निर्णय घेण्याचा कोणताच अधिकार रायगड जिल्हाधिकाऱ्यांना नाही. यामुळे सुनावणी व निर्णयाला स्थगिती देण्यासाठी याचिका कंपनीने उच्च न्यायालयात दाखल केली आहे. कंपनीच्या याचिकेवर उच्च न्यायालयानेही या प्रकरणाची सुनावणी २० सप्टेंबरपर्यत तहकूब करण्याचो आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.


महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, यांचे कार्यालय
Email :- integratedmumbai.ee@mahapwd.com
दुरध्वनी क्र. २२०१६९७४ फॅक्स क्र. २२०१६९७६
ई-निविदा सुचना क्र. १४ सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, एकात्पिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई-०१ (दुरध्वनी क्र. २२०१६९७४/७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराकडून ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये |
| --- | --- | --- |
| १ | जे.जे. रुग्णालय मुंबई भायखळा येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या बांधकामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराकडून शिल्लक कामासाठी प्रस्तावाची विनंती. | ४,५१,३५,०००/- |

(एकूण ०१ कामे)

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक १०/०९/२०२४ सकाळी १०.३० पासून ते दिनांक १७/०९/२०२४ रोजी १७.०० पर्यंत

निविदा पूर्व बैठक : दिनांक १३/०९/२०२४ रोजी दुपारी १६.०० वाजता मा. मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां) प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, ४ था मजला, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१

ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दिनांक १९/०९/२०२४ रोजी १५.०५ वाजता

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
२. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.एघ(सा.बां.)/निविदा/४५३७
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
बांधकाम भवन, २ रा मजला,
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०१६९७४/७६
दिनांक : ५/०९/२०२४

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
फोर्ट, मुंबई.


डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/२७९९

# दोन लाख झोपु घरांची जबाबदारी पुन्हा विकासकांवरच?

■ मुंबई : नितीन देवळेकर

राज्यात पुढील तीन वर्षांत झोपडपट्टी पुनर्वसनात दोन लाखांहून अधिक घरे निर्माण करण्याचे शासनाचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी विविध प्राधिकरणांवर जबाबदारी सोपविण्यात आल्याचे भासविण्यात आले असले, तरी यासाठी विकासक नेमण्याचीही मुभा देण्यात आली आहे.ज्या प्राधिकरणांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे, ते स्वत: बांधकाम निर्मितीत सक्रिय नसल्यामुळे अखेर विकासक वा कंत्राटदारांच्या माध्यमातूनच त्यांना या झोपु योजना पूर्ण कराव्या लागणार आहेत. या सर्व योजनांसाठी मंजुरी देण्याची जबाबदारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणावरच आहे.

रखडलेल्या २२८ योजनांमधील दोन लाख १८ हजार झोपडीवासीयांचे पुनर्वसन त्यामुळे होणार आहे. घाटकोपर येथील रमाबाई आंबेडकर नगर झोपडीवासीयांचे पुनर्वसन याच पद्धतीने मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) सुरू केले आहे. महापालिका, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाप्रीत, महाराष्ट्र गृहनिर्माण प्राधिकरण (महाहौसिंग), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, शिवशाही पुनर्विकास प्रकल्प कंपनी, महाहौसिंग आदी प्राधिकरणांना या दोन लाखांहून अधिक झोपु घरांच्या निर्मितीतील आपला वाटा उचलायचा आहे. याबाबत शासन निर्णय जारी करण्यात आला असून या योजना संबंधित प्राधिकरणांमार्फत संयुक्तपणे राबविल्या तर राज्य शासनाने सवलती देऊ केल्या आहेत.



यामध्ये विविध यंत्रणांना भरावयाचे सर्व शुल्क विक्री घटकातून प्राप्त होणाऱ्या रकमेतून भरण्याची मुभा, पात्रता यादी तयार करताना निवासी व अनिवासी झोपडी हस्तांतरण शुल्कात माफी, शासकीय/निमशासकीय संस्थेस भूखंडाच्या मोबदल्यात देण्यात येणारे २५ टक्के अधिमूल्य सुरुवातीला न देता प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर देण्याची अनुमती या प्रमुख सवलती देण्यात आल्या आहेत. या योजनांसाठी प्राधिकरणांनी विकासक नेमून पुनर्वसन व विक्री घटकाचे काम दिले तर मात्र या सवलती लागू असणार नाही असे स्पष्ट केले आहे. मात्र या योजनांमध्ये विकासक नेमण्यात मुभा दिली आहे. कुठल्याही प्राधिकरणाकडे स्वत:ची बांधकाम निर्मिती यंत्रणा नाही. या प्राधिकरणांना कंत्राटदार नेमून बांधकाम करुन घ्यावे लागणार आहे. याशिवाय या सर्व योजनांसाठी स्वनिधी उभा करावा लागणार आहे. रखडलेल्या अनेक योजनांमध्ये विकासकाला काढून टाकण्याची कारवाई केल्यानंतर मुल्यांकनानुसार विकासकाला रक्कम अदा करणे तसेच झोपडीवासीयांच्या भाड्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणावर राहणार आहे. प्राधिकरणाला या योजना तीन वर्षांच्या कालावधीत पूर्ण कराव्या लागणार आहेत.

## शिवसेना शिंदे गटाच्या बुरखावाटपामुळे महायुतीत वादाची ठिणगी? आशिष शेलारांनी केली टीका

■ मुंबई : गणेश बागडे

नुकताच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मुंबई आणि महाराष्ट्रात महाविकास आघाडीला यश मिळाले. विशेषतः शिवसेनेच्या उबाठा गटाला मुस्लीम मतांचा लाभ झाला, असा आरोप भाजपा आणि शिंदे गटाकडून वारंवार केला जात होता. उद्धव ठाकरे



यांनी हिरव्या मतांच्या जोरावर खासदार निवडून आणले, असेही भाजपा आणि शिंदे गटाचे नेते सांगत होते. मात्र आता याच मुस्लीम समाजाच्या मतांना आकृष्ट करण्याचा प्रयत्न शिंदे गटाकडूनही होताना दिसत आहे. लोकसभा निवडणुकीला दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघातून पराभवाचा सामना करावा लागल्यानंतर भायखळ्याच्या आमदार यामिनी जाधव यांनी आगामी विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रीत केले आहे. नुकताच त्यांनी मुस्लीम महिलांना बुरखा वाटण्याचा कार्यक्रम घेतला. मात्र मित्रपक्षांकडून या कार्यक्रमावर टीका होत आहे. लोकसभा निवडणुकीत यामिनी जाधव यांचा अरविंद सावंत यांच्याकडून ५२ हजार मतांनी पराभव झाला होता. भायखळा विधानसभेतच यामिनी जाधव यांना मताधिक्य मिळू शकले नव्हते. त्यानंतर आता मतदारसंघातील मुस्लीम मतांनाही जवळ करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. यासाठी त्यांनी बुरखा वाटपाचा कार्यक्रम घेतला. मात्र आता यावर भाजपनेच आक्षेप घेतला आहे. मुंबई भाजपाचे अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी या कार्यक्रमावर टीका केली आहे. प्रसार माध्यमांशी बोलत असताना आशिष शेलार यांना यामिनी जाधव यांच्या कार्यक्रमाबाबत प्रश्न विचारला गेला. तेव्हा ते म्हणाले, 'नेमका काय कार्यक्रम घेतला, याची मला माहिती नाही. पण बुरखा वाटप सारखे कार्यक्रम भाजपाला मान्य नाही.' दि. ७ सप्टेंबर रोजी यामिनी जाधव यांनी आपल्या मतदारसंघात १००० बुरखा वाटले होते. या कार्यक्रमानंतर शिवसेना उबाठा गटाने महायुतीवर टीकेची झोड उटविली आहे. उबाठा गटाच्या नेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या की, यामिनी जाधव यांचे कृत्य दुटप्पीपणा आणि स्वार्थी राजकारणाचा कळस आहे.

## भिराच्या पाणी प्रस्तावाला गती,शासन मंजुरीनंतर पनवेल महापालिकेचा ३४०० कोटींचा खर्च

■ पनवेल: सचिन कदम

दोन वर्षापासून भिरा येथील टाटा वीज प्रकल्पातील वीजनिर्मितीनंतर विसर्ग होणाऱ्या पाण्यापैकी ५०० दशलक्ष लिटर पाणी दररोज पनवेलकरांना मिळण्यासाठीच्या प्रस्तावाला कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांनी मंजुरी देऊन तो शासनाकडे पाठविला आहे. या प्रस्तावाला शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर पनवेल महापालिका ३४०० कोटी रुपये खर्च करून ९० किलोमीटर अंतरावरून हे पाणी पनवेलकरांसाठी आणणार आहे.

मंत्रिमंडळाच्या समितीने मंजुरी दिल्यानंतर निविदा प्रक्रिया पार पडल्यावर पुढील तीन वर्षांनंतर पाण्याबाबत पनवेलकर संपन्न होतील. आचारसंहितेपूर्वी या प्रस्तावावर जलसंपदामंत्री निर्णय घेतील. यासाठी पनवेलचे भाजपकडून विशेष प्रयत्न सुरू आहेत.

पनवेल महापालिकेचे




तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांनी २०२२ ऑगस्ट महिन्यात संबंधित प्रस्तावाला प्रशासकीय सर्वसाधारण सभेत मंजुरी दिल्यानंतर या प्रस्तावाला गती मिळाली. पनवेल महापालिका क्षेत्राची सध्याची मागणी २२५ दशलक्ष लिटर असली तरी भविष्यात पनवेलची मागणी ६७६ दशलक्ष लिटर होणार असल्याने पालिकेने २०२२ मध्ये जलसंपदा विभाग, पाटबंधारे विभागाकडे याबाबतची मागणी प्रस्ताव पाठविला. भाजपचे आ. प्रशांत ठाकूर यांनी वीज प्रकल्पानंतर विसर्ग होणारे पाणी वाया जाण्यापेक्षा पनवेलकरांची तहान भागवले यासाठी पालिकेचे मिळावे यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला. पाटबंधारे विभागाने जलसाठ्यातील विसर्गानंतर उरलेल्या पाण्याचे मोजमाप केल्यावर त्याविषयी इतर कोणाची मागणी प्रस्ताव नसल्याची खात्री केल्यावर संबंधित पाणी देण्याची तयारी दर्शविली. याच प्रस्तावामध्ये तत्कालीन पालिका आयुक्त देशमुख यांनी संबंधित प्रकल्पासाठी लागणारा खर्च पनवेल पालिका करण्याची तयारी दर्शविल्याने पाटबंधारे विभागाच्या मुख्य अभियंत्याकडून संबंधित प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित प्रस्ताव या विभागाच्या कार्यकारी संचालकांकडे गेला.

विद्यमान पनवेल पालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी संबंधित प्रस्तावाला चालना मिळण्यासाठी पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अधिकारी विलास चव्हाण यांना याबाबत पाठपुराव्यासाठी नेमले आहे. नुकताच या पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी संचालक कार्यालयाने संबंधित प्रस्तावाला शासनाकडे पाठविल्याची माहिती जलसंपदा विभागाच्या विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली.

## लाज असेल तर माफी मागा, माजी खासदार राजन विचारे यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका

■ ठाणे : तृप्ती गोरे

शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांच्या आनंद आश्रमात पैशांच्या उधळणीचे चित्रीकरण प्रसारित झाले. या



घटनेनंतर विरोधकांकडून शिंदे गटावर टीका केली जात आहे. शनिवारी ठाकरे गटाचे माजी खासदार राजन विचारे यांनीही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लक्ष्य केले. लाज शिल्लक असेल तर तुम्ही माफी मागा अशी टीका राजन विचारे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केली. आनंद आश्रमात सर्व जाती धर्मातील नागरिकांना आनंद दिघे यांनी न्याय दिला होता. आनंद दिघे यांच्या नावाखाली हजारो लोक मोठे झाले. परंतु त्याच आनंद आश्रमात स्वतःचे नाव टाकून शिवसेना संपविण्याचे, कार्यकर्त्यांचा रोजगार बळकविण्याचे आणि आनंद दिघे यांनी तयार केलेल्या कार्यकर्त्यांना संपविण्याचे काम सुरू झाले आहे. आता आनंद आश्रमात पैशांच्या उधळणीचे चित्रीकरण पाहिल्यानंतर तळपायाची आग मस्तकात गेली आहे. आनंद दिघे हयात असते तर तुमची हिंमत झाली असती काय? त्यांनी तुम्हाला हंटरने बडवले असते असे राजन विचारे म्हणाले. ज्या आनंदाश्रमामधून गोरगरिबांना न्याय देण्याचे काम अनेक वर्ष करण्यात आले त्यावर तुम्ही स्वतःचे पाटी लावली अशी टीकाही त्यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर केली. आमच्यासाठी आनंद आश्रम मंदिर आहे.

## 'गेलेली सत्ता पुन्हा खेचून आणणार', उद्धव ठाकरे यांचा महायुतीला इशारा

■ मुंबई : नितीन देवळेकर

शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आज शिर्डी आणि छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूवीर उद्धव ठाकरे यांचा हा दौरा महत्वाचा मानला जात आहे. या दौऱ्यावेळी त्यांनी जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी सुरु असलेल्या महाअधिवेशनाला हजेरी लावली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी महायुतीवर हल्लाबोल केला. तसेच गेलेली सत्ता पुन्हा येईल. गेलेली सत्ता पुन्हा खेचून आणणार आहे, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी महायुतीच्या नेत्यांना दिला आहे.

'मी देखील या ठिकाणी आलो आहे. मला सत्तेची पर्वा नाही. मला तुमच्या आयुष्याची चिंता आहे. मला तुमच्या कुटुंबाची पर्वा आहे. सत्ता येत असते आणि सत्ता जात असते. गेलेली सत्ता पुन्हा येणार आहे. गेलेली सत्ता पुन्हा खेचून आणणार आणि सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे. मात्र, एक लक्षात घ्या, एकजूट महत्त्वाची आहे. याआधी एकदा जुनी पेन्शन योजनेसाठी तुम्ही सर्वजण नागपूरला आला होतात. मात्र, तुमच्यापैकी एक घटक तिकडे गेला आणि तुमच्या आंदोलनावर पाणी ओतलं. जे फोडाफोडीचं राजकारण शिवसेनेबरोबर करण्यात आलं. हे जुनी पेन्शन योजनेसाठी आंदोलन करणाऱ्यांबरोबर देखील करतील. हे सरकार गेल्यात जमा आहे. खरं तर



महायुतीच्या नेत्यांना सत्तेशिवाय उपाशी ठेवलं पाहिजे, असा निर्धार करायला हवा', असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी महायुतीवर केला.

'विधानसभेची निवडणूक जवळ येईपर्यंत ज्यांना आपली बहीण माहिती नव्हती. त्यांनी लाडकी बहीण योजना आणली. आता दोन महिन्यांनी निवडणुका आहेत. मी तुम्हाला वचन देतो की, दोन महिन्यांनी आपलं सरकार आलं तर मी तुमची जुनी पेन्शन योजनेची मागणी मान्य करतो. आता मी ही घोषणा केल्यानंतर महायुतीला घाम फुटेल आणि ते ही तुमची मागणी कदाचित मान्य करतील. हा दगाफटका तुम्हाला नाही तर महाराष्ट्राला होणार आहे. पण तुम्ही एक लक्षात घ्या ज्यांनी माझ्याशी गद्दारी केली त्यांना मी कुटुंबातील मानलं होतं. ते विश्वासघात करू शकतात मग हे तुमच्यावर वार करू शकणार नाहीत का? त्यामुळे मला हे सरकार नको आहे. मला मुख्यमंत्री होण्याचं स्वप्न तेव्हाही नव्हतं आणि आताही नाही', असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी महायुतीवर केला. 'मला सत्तेमधून कोणीही निवृत्त करु शकत नाही. मी सत्तेत असलो किंवा नसलो तरी जोपर्यंत जनता माझ्याबरोबर आहे. तोपर्यंत सत्ता ही आपल्याकडेच राहील. कारण जनतेची सत्ता आहे. सरकार वेगळं असलं तरी जनतेची सत्ता ही महत्वाची असते. जनता हीच माझी ताकद आणि जनता हीच माझी सत्ता आहे', असंही उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

## राज्यातील ११ हजार कोटींच्या रस्ते कामासाठी १९ निविदा

■ मुंबई : विशाल कारंडे

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) राज्यातील तीन महत्त्वाकांक्षी रस्ते प्रकल्पांतील उर्वरित बांधकामासाठी एकूण सहा टप्प्यांत निविदा मागविल्या होत्या. नुकत्याच तांत्रिक निविदा खुल्या करण्यात आल्या असून सुमारे ११ हजार कोटी रुपयांच्या कामाच्या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. मुंबई – नागपूर समृध्दी महामार्ग विस्तारीकरणातील नागपूर – गोंदिया आणि भंडारा – गडचिरोली महामार्ग प्रकल्पातील एकूण तीन टप्प्यांसाठी ११ निविदा सादर झाल्या आहेत. तर पुणे वर्तुळाकार रस्ता प्रकल्पातील शेवटच्या तीन टप्प्यांतील कामांसाठी एकूण आठ निविदा सादर झाल्या आहेत. एमएसआरडीसीच्या चार हजार किमीहून अधिका लांबीच्या रस्ते प्रकल्पातील महत्त्वाकांक्षी अशा पुणे वर्तुळाकार, नागपूर – गोंदिया आणि भंडारा-गडचिरोली प्रकल्पातील काही टप्प्यांतील कामासाठी मार्चमध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार पुणे वर्तुळाकार रस्त्याच्या नऊ टप्प्यासह भंडारा – गडचिरोली आणि नागपूर – गोंदिया द्रुतगती मार्गातील काही टप्प्यातील कामासाठीच्या निविदा निश्चित करण्यात आल्या आहेत. मात्र या निविदा वाढीव दराने आल्याने त्यांचे मूल्यांकन आणि नव्याने निविदांचे दर निश्चित



करून निविदा अंतिम करण्याचा प्रस्ताव एमएसआरडीसीकडून राज्य सरकारकडे सादर करण्यात आला आहे. त्यानुसार लवकरच निविदा अंतिम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या तिन्ही प्रकल्पांच्या कामाला शक्य तितक्या लवकर सुरुवात करण्याचे एमएसआरडीसीचे नियोजन आहे. एमएसआरडीसीने आधीच्या टप्प्यातील निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असतानाच उर्वरित टप्प्यातील बांधकामासाठी जुलैमध्ये निविदा मागविल्या होत्या. काही तांत्रिक कारणामुळे या तीन प्रकल्पांतील सहा टप्प्यांसाठी मार्चमध्ये एमएसआरडीसीला निविदा मागविता आल्या नव्हत्या. एकूण ११ हजार कोटींच्या या तीन प्रकल्पांसाठीच्या तांत्रिक निविदा नुकत्याच खुल्या करण्यात आल्याची माहिती एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. त्यानुसार पुणे वर्तुळाकार रस्त्यातील शेवटच्या तीन टप्प्यांसाठी आठ, भंडारा – गडचिरोली महामार्गातील शेवटच्या दोन टप्प्यांतील कामासाठी सात आणि नागपूर – गोंदिया महामार्गाच्या एका टप्प्यासाठी चार निविदा सादर झाल्या आहेत.

## डबेवाले व चर्मकार समाजाला राज्य सरकारचं मोठं गिफ्ट, मुंबईतील हक्काच्या घराचं स्वप्न पूर्ण होणार, १२००० घरं बांधणार

■ मुंबई : सम्यक कासारे

मुंबईतील डबेवाले आणि चर्मकार समाजाबांधवांसाठी राज्य सरकारने १२ हजार घरांची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी आज (१३ सप्टेंबर) विकासक आणि शासनामार्फत एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे. यातून डबेवाल्यांचे ६० वर्षापासूनचे स्वप्न येत्या ३ वर्षात साकार होणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. फडणवीस यांनी यासंदर्भातील विधानसभेत आश्वासन दिलं होतं, त्याची यानिमित्ताने पूर्तता होणार आहे. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात आयोजित एका कार्यक्रमात हा सामंजस्य करार केला गेला. त्यानंतर फडणवीसांनी उपस्थितांना संबोधित करताना डबेवाले व चर्मकारांना शुभवार्ता दिला. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत



ही घरं बांधली जाणार असून म्हाडाने यासाठी पुढाकार घेतला आहे. प्रियांका होम्स रियालिटी या प्रकल्पासाठी ३० एकर जागा देणार असून, नमन बिल्डर 'ना नफा ना तोटा' या तत्वावर घरांचं बांधकाम करणार आहेत. यातून १२ हजार घरांची निर्मिती होणार असून, ती घरं डबेवाले व चर्मकार समाजातील बांधवांसाठी उपलब्ध होणार आहेत.डबेवाले व चर्मकार समाजातील लोकांना अवघ्या २५ लाख रुपयांमध्ये प्रत्येकी ५०० चौरस फूट आकाराचे घर दिले जाणार आहे. डबेवाले आणि चर्मकार बंधूंचं स्वतःच्या हक्काच्या घराचं स्वप्न हे येत्या ३ वर्षात पूर्ण होणार आहे.

आपले डबेवाले जागतिक पातळीवर ख्यातीप्राप्त आहेत. वारकरी संप्रदायाचा वारसा त्यांनी कधीही सोडलेला नाही. आपले तत्त्व आणि निष्ठा त्यांनी कधीही ढळू दिल्या नाहीत, म्हणूनच ते व्यवस्थापनातील अतिशय उत्कृष्ट मॉडेल आहे.

## म्हाडा घरांच्या किमतीत वाढ, अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे ऐनवेळी किंमतीत बदल करण्याची वेळ

■ मुंबई : राकेश गायकवाड

म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या ऑक्टोबर २०२४ च्या सोडतीतील पुनर्विकासाअंतर्गत उपलब्ध झालेल्या ३७० घरांच्या किमतीत १० ते २५ टक्क्यांची कपात करून म्हाडाने अर्जदारांना दिलासा दिला. मात्र, त्याचवेळी ३७० पैकी अल्पगटातील १४ घरांच्या किमती २० टक्क्यांनी कमी होण्याऐवजी १२ ते १३ लाख रुपयांनी वाढल्या.

मुंबई मंडळातील अधिकाऱ्यांनी घरांच्या किमती निश्चित करताना घातलेल्या घोळाचा फटका इच्छुक, अर्जदारांना बसणार आहे. या १४ घरांसाठी चुकीच्या शीघ्रगणकानुसार (रेडी रेकनर) किमती निश्चित करण्यात आल्या. त्यामुळे अर्ज विक्री-स्वीकृती प्रक्रियेस काही दिवस शिल्लक असताना किमतीत बदल करण्याची नामुष्की मंडळावर आली. या घरांच्या सुधारित किमती मंडळाने जाहीर केल्या आहेत.

मुंबई मंडळाला म्हाडा वसाहतीच्या ३३ (५) अंतर्गत पुनर्विकासाद्वारे आणि उपकरप्राप्त इमारतींच्या ३३ (७) अंतर्गत पुनर्विकासाद्वारे २०२४ च्या सोडतीसाठी ३७० घरे उपलब्ध आहेत. उपलब्ध घरांच्या किमती या नियमानुसार त्या त्या परिसरातील शीघ्रगणक दराच्या ११० टक्के दराने निश्चित करण्यात येतात. मात्र, या घरांचे क्षेत्रफळ, उत्पन्न गट आणि घरांच्या किमती यात तफावत असल्याने घरे महाग झाली आहेत. त्यामुळे यावरून म्हाडावर मोठी टीका होत होती. अल्प गटातील घर पावणेतीन कोटी रुपयांच्या घरात गेले होते. यावरून झालेली टीका लक्षात घेऊन म्हाडा प्राधिकरणाने घरांच्या किंमती उत्पन्न गटानुसार १० ते २५ टक्क्यांची कपात केली. त्यानुसार ३७० घरांच्या किंमतीत घट झाली असून नवीन किंमती म्हाडाच्या सोडतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. असे असताना या ३७० घरांपैकी कुर्ल्यातील संकेत क्रमांक ४९५ मधील अल्प गटातील स्वानंद प्रकल्पातील १४ घरांच्या किमती नियमानुसार २० टक्क्यांनी कमी होणे अपेक्षित होते. 'स्वानंद' प्रकल्पातील १४ घरांसाठी ४३ लाख ९७ हजार ९५९ रुपये आणि ४५ लाख ४० हजार २०० रुपये अशा किमती निश्चित करण्यात आल्या होत्या. म्हाडा प्राधिकरणाच्या २८ ऑगस्टच्या निर्णयानुसार या घरांच्या किमतीत २० टक्क्यांनी कपात होईल, अशी आशा या घरांसाठी अर्ज भरलेल्यांना तसेच अर्ज भरू इच्छिणाऱ्यांना होती. किमतीत कपात होण्याऐवजी २ सप्टेंबरला या किमतीत १२ ते १३ लाख रुपयांनी वाढ करण्यात आली. त्यामुळे ४३ लाख ९७ हजार ९५९ रुपये असलेली घराची किंमत ५६ लाख ७९ हजार ३१३ रुपये झाली आहे. तर ४५ लाख ४० हजार २०० रुपयाला असलेल्या काही घरांची किंमत आता ५८ लाख ६३ हजार २६३ रुपये झाली आहे.

मुंबई मंडळाच्या शुद्धीपत्रानुसार या घरांच्या किंमती २०२४-२५ च्या शीघ्रगणकानुसार निश्चित करण्यात आल्या. मात्र चुकीचे शीघ्रगणकाचे दर आकारण्यात आले. १ लाख २५ हजार १७० रुपये प्रति चौरस मीटर याप्रमाणे दर निश्चित करणे आवश्यक असताना संबंधित अधिकाऱ्याने ८५ हजार २९४ प्रति चौरस मीटर दराने त्या निश्चित करण्यात आल्या.